ठराव :- सदर कामाकरीता खालील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
०१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ
०२.	कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी	१५/७/२०२५
०३.	महापालिकेचे पत्र	२३/७/२०२५
०४.	संविदा मंजूरी ठराव	०८/०८/२०२५
०५.	कार्यादेश देणे/ करारनामा करणे	१४/०८/२०२५
०६.	काम सुरू करणे	१८/०८/२०२५
०७.	काम पूर्ण करणे	१७/१०/२०२५
०८.	देयक सादर करणे	२१/१०/२०२५
०९.	देयकाचे प्रदान करणे	१०/११/२०२५

तरी **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील संख्येश्वर नगर वॉर्ड क्र. ७० मध्ये साई साकार अपा., ए व बी विंग येथे सी.सी. गटार बांधणे** कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. **४,३९,८२१**/-इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग - ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई- विरार शहर महानगरपालिका यांचे कडील कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आ.का./४७/२०२१ दि. २५/०६/२०२१ अन्वये अत्यावश्यक सेवेत येणारी अत्यंत अपवादात्मक स्वरूपाची कामे कार्यकारी अभियंता यांचे मान्यतेने करणेत यावेत असे आदेश आहेत. तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने कोटेशन पद्धतीने करुन घेण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकामधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo tagged फोटोग्राफस् सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पश्चिम), जि.पालघर, पिन नं.401303
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९९२ **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक :२१/०७/ **२०२५**

---

१. प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) आचोळे वॉर्ड क्र. ६९ मधील महालक्ष्मी अपा., च्या मागे सी.सी. गटार बांधणे** कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

२. प्रस्तावाचा मजकूर वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील महालक्ष्मी अपा., च्या मागील बाजुस असलेल्या गटारावरील स्लॅब व परदी नादुरुस्त व तुटलेल्या अवस्थेत आहे. सदर गटाराच्या स्लॅब वरुन नागरिकांची येजा सुरु असते. तसेच गटाराचे पाणी परदीमधुन परिसरातील चाळीमध्ये शिरत असल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी प्राप्त् होत आहेत व लोकप्रतिनिधी देखील मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पहाणी केली असता सदरचे गटार नव्याने बांधणे आवश्यक आहे. त्यानुसार **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) आचोळे वॉर्ड क्र. ६९ मधील महालक्ष्मी अपा., च्या मागे सी.सी. गटार बांधणे** आवश्यक वाटते तरी या कामाचे रक्कम **रु. ४,८५,१३३/-** इतक्या किमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

३. अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. **४,८५,१३३/-**

४. कामाचे स्वरूप :- लांबी ६३ X रुंदी ०.९

५. यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल:- सदर काम मागील ३ वर्षात झालेले नाही.

६. जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७. विकासआराखडयातील आरक्षण -

वरील काम करण्यासाठी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून सन २०२२-२३ च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर सूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग - ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई- विरार शहर महानगरपालिका यांचे कडील कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आ.का./४७/२०२१ दि. २५/०६/२०२१ अन्वये अत्यावश्यक सेवेत येणारी अत्यंत अपवादात्मक स्वरूपाची कामे कार्यकारी अभियंता यांचे मान्यतेने करणेत यावेत असे आदेश आहेत.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन तांत्रिक मंजूरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे, संविदा मंजूरी करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. प्रक्रिया नमुद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

याकामी खालील विहित करून देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकरी/ कर्मचारी यांची असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
०१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ
०२.	मा. कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मंजूरी	१५/७/२०२५
०३.	महापालिकेचे पत्र	२३/७/२०२५
०४.	संविदा मंजूरी ठराव	०८/०८/२०२५
०५.	कार्यादेश देणे/ करारनामा करणे	१४/०८/२०२५
०६.	काम सुरू करणे	१८/०८/२०२५
०७.	काम पूर्ण करणे	१७/१०/२०२५
०८.	देयक सादर करणे	२१/१०/२०२५
०९.	देयकाचे प्रदान करणे	१०/११/२०२५

तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाची असल्याने वरील नमुद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
०१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ
०२.	कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी	१५/७/२०२५
०३.	महापालिकेचे पत्र	२३/७/२०२५
०४.	संविदा मंजूरी ठराव	०८/०८/२०२५
०५.	कार्यादेश देणे/ करारनामा करणे	१४/०८/२०२५
०६.	काम सुरू करणे	१८/०८/२०२५
०७.	काम पूर्ण करणे	१७/१०/२०२५
०८.	देयक सादर करणे	२१/१०/२०२५
०९.	देयकाचे प्रदान करणे	१०/११/२०२५

तरी **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) आचोळे वॉर्ड क्र. ६९ मधील महालक्ष्मी अपा., च्या मागे सी.सी. गटार बांधणे** कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ४,८५,१३३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग - ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे कडील कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आ.का./४७/२०२१ दि. २५/०६/२०२१ अन्वये अत्यावश्यक सेवेत येणारी अत्यंत अपवादात्मक स्वरूपाची कामे कार्यकारी अभियंता यांचे मान्यतेने करणेत यावेत असे आदेश आहेत. तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने कोटेशन पद्धतीने करुन घेण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकामधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo tagged फोटोग्राफस् सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

11/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. EE3

विभाग :- वाहन
दिनांक :-११ /१०/ २०२५

विषय :- <u>श्रीगणेश मूर्ती विसर्जनासाठी कन्व्हेअर बेल्ट खरेदीकामी ई-निविदा मागविणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.</u>

<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :- महाराष्ट्र राज्यात दि.२७/०८/२०२५ ते दि. ०६/०९/२०२५ या कालावधीत तिथीनुसार गणेशोत्सव साजरा होणार आहे. महानगरपालिकेने गणरायाच्या विसर्जनाकरिता महापालिकेमार्फत विविध सोयी सुविधा केल्या जात आहेत. गतवर्षी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे ३३७०१ सार्वजनिक गणेश मंडळ व घरगूती मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आलेले होते.

मा. उच्च न्यायालय व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळांचे मार्गदर्शक सुचनांनुसार गणेशमूर्ती नैसर्गिक स्त्रोतात विसर्जन न करता कृत्रिम तलावात विसर्जन करावे अशा निर्देश व सुचना आहेत. त्यानुसार मा. आयुक्त महोदय यांनी कृत्रिम तलाव व दान करण्यात आलेल्या मुर्त्या तलावांवर संकलित करुन त्यांचे विसर्जन गतवर्षी बंद खाणीमध्ये केलेले होते. तसेच शहरात प्रत्येक प्रभागनिहाय फिरते कृत्रिम तलावांचेही नियोजन करणेत आलेले होते. महापालिकेने सद्यपरिस्थितीत ४ ठिकाणी असलेल्या बंद खाणी / जेट्टीमध्ये गणेशमूर्ती विसर्जन करणेत येते.

शहरातील घरगुती गणेश मूर्ती या २ ते ३ फुटापर्यंत असतात. तसेच या गणेश मूर्तींची संख्या अंदाजे १६,००० इतकी आहे. सदरच्या गणेश मूर्त्यांचे कृत्रिम तलावात विसर्जन केले जाते. या गणेशमूर्त्या संकलित केंद्राच्या ठिकाणी एकत्र ठेवल्या जातात. तद्नंतर संकलित केलेल्या गणेश मूर्त्या वाहनाव्दारे बंद खाणीमध्ये विसर्जन करणेकामी नेल्या जातात. सदरच्या मूर्त्या मनुष्यबळाचा वापर करुन विसर्जन केल्या जातात. त्यामुळे या मूर्ती विसर्जन करणे वैयक्तिकरित्या असुरक्षित व अडचणीचे होवून यासाठी वेळ तसेच अधिकचे परिश्रम खर्च करावे लागतात.

श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन सुरक्षितरित्या तसेच वेळेत होणेच्या दृष्टीने मागील वर्षी कन्वेअर बेल्ट यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आलेली होती. सदर यंत्रसामुग्रीव्दारे श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन कमी वेळेत, कमी मनुष्यबळ परिश्रम व सुरक्षितरित्या झालेले आहे. तसेच याबाबत नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. सदरची यंत्रसामुग्री प्रायोगिक तत्वावर प्रथमत: वालईपाडा खदाण येथे वापरण्यात आलेली होती. त्यामध्ये कृत्रिम तलावामधुन वाहनाव्दारे संकलित केलेल्या अंदाजे ८६५२ श्रीगणेशमूर्तींचे कन्वेअर बेल्टच्या सहाय्याने विसर्जन करण्यात आलेले होते.

त्याचप्रमाणे वसई विरार कार्यक्षेत्रातील राजावली खदाण, मारंबळपाडा जेट्टी व किल्लाबंदी जेट्टी येथे गतवर्षी कृत्रिम तलावामधुन वाहनाव्दारे संकलित केलेले श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आलेले होते. विसर्जनकामी त्याठिकाणी मोठया प्रमाणावर मनुष्यळाचा वापर

करण्यात आला, तसेच अतिरिक्त वेळ खर्च करावा लागला. त्याकरिता सदर ठिकाणी श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करणेकामी कन्वेअर बेल्टचा वापर करणे उचित होईल. जेणेकरुन विसर्जन सुरक्षित, कमी मनुष्यबळ आणि वेळेत होण्यास मदत होईल. गतवर्षी कन्वेअर बेल्ट यंत्रसामुग्री प्रायोगिक तत्वावर र.रु. ९,८८,५८०/- या किंमतीत खरेदी केलेले होते. परंतु, गतवर्षी वालईपाडा खदाण येथे मशीन हाताळणीच्यावेळी आलेल्या यांत्रिकी अडचणीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने सदर मशीनींमध्ये आवश्यक ते बदल करुन खालील तपशीलानुसार यंत्रसामुग्री खरेदी करणे उचित होईल.

अ.क्र.	यंत्रसामुग्री प्रकार	तपशील
१	PLASTIC MODULAR BELT CONVEYOR	CONVEYOR LENGTH १०.४M, HEIGHT ९००MM ADJUSTABLE.
२		PLASTIC MODULAR BELT WIDTH ६००MM,
३		MS FABRICATED STRUCTURE SQ.TUBE- ५०X५०X२MM
४		MS SIDE FRAME, SKID PLATE-३MM THK.
५		GRAVITY ROLLER CONVEYOR WIDTH ६००MM, LENGTH ६००MM, ३८MM DIA.
६		MS RETURN IDLER ROLLER DIA.५०MM
७		GEAR MOTOR -१HP BONVARIO MAKE.
८		ELECTRICAL CONTROL PANEL CONSIDERED WITH VFD, ON OFF BUTTON EMERGENCY SWITCH.
९		CASTER WHEEL-RUBBER TYPE. ६ INCH DIA. COSIDERED

उपरोक्त यंत्रसामुग्रीच्या विवरणानुसार बाजारात माहिती घेतली असता खालीलप्रमाणे दरपत्रक प्राप्त झालेली आहेत.

अ.क्र.	कंपनीचे नाव	दर (सर्व करांसहित)
१	मे. फ्लेक्सट्रॅक	१५,६६,९६६/-
२	मे. ए.एस.एंटरप्रायजेस	१५,०१,००४/-
३	मे. स्कायग्रीप ऑटोमेशन	१३,६९,०८१/-

उपरोक्तप्रमाणे प्राप्त दरपत्रक कन्व्हेअर बेल्ट खरेदीसाठी प्रती नग जास्तीत जास्त अंदाजित र.रु.१५,६६,९६६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२५-२६ या अर्थसंल्पातील **"वाहन खरेदी / रोडरोलर खरेदी"** या लेखाशिर्षांतर्गत शिल्लक असलेल्या र.रु. २,००,००,०००/- रकमेतुन करता येईल.

तरी श्रीगणेशमूर्ती विसर्जन करणेकामी महापालिका मालकिचे अतिरिक्त कन्व्हेअर बेल्ट खरेदी करणेकामी ई-निविदा मागविणे तसेच याकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१६,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महापालिकेस श्रीगणेशमूर्ती विसर्जन करणेकामी महापालिका मालकिचे कन्व्हेअर बेल्ट खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच याकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१६,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

11/9

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 964 विभाग : बांधकाम विभाग
दिनांक: 11/7/2025

प्रस्तावाचा विषय:- **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. ६९ मध्ये कनुंगो अपार्टमेंट समोर पाथवे बनविणे.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ६९ मध्ये कनुंगो अपार्टमेंट समोरील पाथवे हा नादुरुस्त असल्याकारणाने तेथील रहिवास करणाऱ्या लोकांना व शालेय मुलांना त्यावरुन येजा करणे धोक्याचे झाले आहे. व एखादा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी तेथील लोकप्रतिनिधी व माजी. महापौर यांनी सदर पाथवे नविन करुन घेण्याची मागणी केली आहे. **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. ६९ मध्ये कनुंगो अपार्टमेंट समोर पाथवे बनविणे** या कामाचे रक्कम रु. **२,९३,८९९/-** इतक्या किमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे.

कामाचे स्वरुप :- पाथवे लांबी ८२ मी. X रुंदी १.५० मी.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजुरी घेणे, निविदा कार्यवाही करणे, संविदा मजुरी प्राप्त करणे, करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिद्धी करणे	२१/०७/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२९/०७/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	०७/०८/२०२५
५	संविदा मंजुरी ठराव	२०/०८/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	२९/०८/२०२५
७	काम सुरु करणे	०४/०९/२०२५
८	काम पुर्ण करणे	०३/११/२०२५
९	देयक सादर करणे	१०/११/२०२५
१०	देयकाचे प्रदान करणे	१४/११/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२०/११/२०२५

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. ६९ मध्ये कनुंगो अपार्टमेंट समोर पाथवे बनविणे कामी बांधकाम विभागामार्फत चालु दरसुची सन २०२२-२३ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९३,८९९/- अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :-

सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिद्धी करणे	२१/०७/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२९/०७/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	०७/०८/२०२५
५	संविदा मंजुरी ठराव	२०/०८/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	२९/०८/२०२५
७	काम सुरु करणे	०४/०९/२०२५
८	काम पुर्ण करणे	०३/११/२०२५
९	देयक सादर करणे	१०/११/२०२५
१०	देयकाचे प्रदान करणे	१४/११/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२०/११/२०२५

सदर कामाकरिता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहिस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल तरी **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड क्र. ६९ मध्ये कनुंगो अपार्टमेंट समोर पाथवे बनविणे** कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम **रु २,९३,८९९/-** इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाच्या अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस मंजुरी देत आहे. तसेच अंदाजपत्रक मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo - Tagging फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतर कामाची रक्कम अदा करण्यात यावी.

11/07

अनिलकुमार पवार (भा. प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी-०२५-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई- मेल-Vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ९९५ विभाग : मालमत्ता व्यवस्थापन

दिनांक : ११/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपूलाच्या पूर्वेकडिल ३० मी रुंद डी पी रस्त्याने बाधित होणाऱ्या खाजगी जागा हस्तांतरीत करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, उपरोक्त विषयान्वये बांधकाम विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपूलाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सदर बांधकाम हे पूर्वेकडिल ३० मी रुंद डी. पी रस्त्यावर होत आहे. सदर डी.पी रस्त्यामध्ये खाजगी जागा बाधित होत असून काही जागा ह्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. सदर डी.पी रस्त्याने बाधित खाजगी जागा हस्तांतरण करुन त्यांना TDR/FSI देण्याची कार्यवाही करण्याबाबत मा. आमदार श्री. राजन नाईक, १३२ विधानसभा यांनी स्थळ पाहणी दरम्यान सुचना केलेल्या आहेत. त्यानुषंगाने मा. आयुक्त महोदय यांनी तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देश दिलेले आहेत.

सदर प्रस्तावासोबत बांधकाम विभागामार्फत मौजे- नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपूलाच्या पूर्वेकडिल ३० मी रुंद डी. पी रस्त्याने बाधित होणाऱ्या जागांचे सर्व्हेक्षण मे. श्रध्दा लॅन्ड सर्व्हेअर्स यांचेमार्फत करुन घेण्यात आले असून बाधित होणाऱ्या जागेचा तपशिल जोडला आहे तो पुढील प्रमाणे.

अ.क्र	सर्वे नं/ हि.नं	७/१२ क्षेत्रफळ	आकारबंद क्षेत्रफळ	गटबुक नुसार क्षेत्रफळ	डी.पी रोडने बाधित क्षेत्र	७/१२ धारकाचे नाव
१	२२६/१	००-०३-५०	००-०३-५०	००-०३-८०	००-०३-४५	कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
२	२२६/२अ	००-०९-२०	००-१२-१०	००-१२-००	००-०३-१५	लक्ष्मण गोविंद पाटील व इतर ४०
३	२२६/२ब	००-०३-००				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
४	२२६/२५अ	००-०४-६०	००-०५-१०	००-०४-८५	००-००-५०	विजय तुकाराम पाटील
५	२२६/२५ब	००-००-५०				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
६	२३०अ	००-३३-००	००-३३-४०	००-३४-००	००-०५-४५	महाराष्ट्र शासन
७	२२९/३७अ	००-०४-४०	००-१४-४०	००-१३-८५	००-१०-१०	लक्ष्मण नाना पाटील
८	२२९/३७ब	००-१०-००				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
९	२२९/१९	००-००-००	००-००-००	००-०४-५०	००-०१-२०	७/१२ बंद
१०	२२९/१८अ	००-०१-५०	००-०१-५०	००-०१-९५	००-०१-९५	कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
११	२२९/१७अ	००-००-५०	००-०२-००	००-०२-३०	००-०२-३०	बेबीबाई रामा घरत व इतर १४
१२	२२९/१७ब	००-०१-५०				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
१३	२२९/१६ब	००-०१-००	००-०१-५०	००-०१-५५	००-०१-५५	कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
१४	२२९/१५अ	००-०१-००	००-०१-००	००-०१-००	००-०१-००	कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
१५	२२९/१४अ	००-०१-००	००-०४-००	००-०४-००	००-००-४०	कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
१६	२२९/११अ	००-०५-९०	००-०९-४०	००-०९-००	००-०३-७०	इमाम मुमताजखान पठाण व इतर ५
१७	२२९/११ब	००-०३-५०				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे

१८	२२९/१०अ१	००-०९-४०	००-२७-३०	००-२८-९०	००-११-०५	कैलास दशरथ पाटील व इतर ९
१९	२२९/१०/२	००-०४-५०				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
२०	२२९/१०/३	००-०८-००				कैलास दशरथ पाटील व इतर ९
२१	२२९/९अ	००-०२-५०	००-०२-५०	००-०२-७५	००-००-८०	कमळाकर सुदंर पाटील
२२	२२९/८अ	००-०२-५०	००-०२-५०	००-०२-४०	००-००-१०	श्रध्दा संदेश म्हात्रे व इतर १०
२३	२२९/७अ	००-०३-३०	००-०३-३०	००-०३-१०	००-००-२०	महेश्वर हाशा पाटील व इतर १०
२४	२२७/१अ	००-८१-२०	०१-०६-२०	००-००-००	००-२५-४०	वनिता मधूकर पाटील व इतर ८
२५	२२७/१ब	००-२५-००				कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
२६	२३२/९	००-०८-३०	००-०८-३०	००-०९-००	००-००-३०	हरेश्वर नारायण पाटील व इतर १
२७	२३२/१०अ	००-०५-१०	००-०५-१०	००-०९-८०	००-०५-६५	गंगाबाई गोविंद पाटील व इतर ५
२८	२३२/१०ब	००-०३-७०	००-०३-७०			कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे
२९	२२८/२	००-२२-३०	००-२२-३०	००-२१-८५	००-०८-७५	राजेंद्र मधूकर नाईक
३०	२२८/१अ	००-७४-७०	००-७४-७०	००-८३-६०	००-१२-९५	अनुसया नरेश भोईर व इतर ११
३१	२२८/१ब	००-०४-५०	००-०४-५०			कार्य.अभियंता सा.बा.वि.ठाणे

वरील तक्त्यामधील ३० मी. डी.पी रस्त्यामध्ये बाधित होत असलेल्या जागेमधील काही जागा ही सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांचे मार्फत हस्तांतरीत केली असून उर्वरीत अनुक्रमे २,४,७,११,१६,१८,२०,२१,२२,२३,२४,२६,२७,२९,३० या खाजगी मालकीच्या जागा उड्डाण पूलाचे काम सुरळित व जलदगतीने होणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये नोटीस बजाऊन आरक्षणा खालील बाधीत क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यावर मोबदला म्हणून हस्तांतरीत विकास हक्क (T.D.R) स्वरुपात देण्यात येईल, याकरीता ७/१२ धारक यांना नोटीस बजावणे आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२-अ खालील तरतुदी नुसार **मा. आयुक्त तथा प्रशासक** यांना अधिकार प्राप्त झालेले आहेत.

तरी मौजे- नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपूलाच्या पूर्वेकडिल ३० मी रुंद डी. पी रस्त्याने बाधित होणाऱ्या जागा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये नोटीस बजाऊन आरक्षणा खालील बाधीत क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात यावा याकरीता ७/१२ धारक यांना नोटीस बजावून आरक्षणा खालील बाधित क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यावर त्याबाबतचा मोबदला म्हणून हस्तांतरीत विकास हक्क (TDR) चे माध्यमातून देणेबाबत व सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेमार्फत हस्तांतरीत करण्यात आलेली जागा वसई विरार शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत होणेकरिता मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांचेकडे सादर प्रस्ताव पाठविणे तसेच अ.क्र.६ वरील महाराष्ट्र शासनाच्या जमिनीचा ताबा महानगरपालिकेकडे देणेबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस प्रशासकीय मंजुरीस्तव **मा. आयुक्त तथा प्रशासक** यांच्या मान्यतेकरिता तथा आदेशास्तव सविनय सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपूलाचे बांधकाम प्रगती पथावर आहे. ३० मी. डी.पी रस्त्यामध्ये बाधित होत असलेल्या जागेमधील काही जागा ही सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांचे मार्फत हस्तांतरीत केली असून उर्वरीत अनुक्रमे २, ४, ७, ११, १६, १८, २०, २१, २२, २३, २४, २६, २७, २९, ३० या खाजगी मालकीच्या जागा उड्डाणपूलाचे काम सुरळित व जलदगतिने होणेकरीता बाधीत क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तरी मौजे- नारंगी येथील पुर्व, पश्चिम जोडणाऱ्या उड्डानपूलाच्या पूर्वेकडिल ३० मी रुंद डी पी रस्त्याने बाधीत होणारी जागा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे

कलम १२६ अन्वये नोटीस बजाऊन आरक्षणा खालील बाधीत क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात यावा, याकरीता ७/१२ धारक यांना नोटीस बजावून आरक्षणा खालील बाधित क्षेत्र महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यावर त्याबाबतचा मोबदला म्हणून हस्तांतरीत विकास हक्क (TDR) देणेबाबत तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांचेमार्फत हस्तांतरीत केलेली जागा वसई विरार शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत होणेकरिता प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांचेकडे सादर करणेकामी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर जमिन मालकांच्या नावांची यादी वृत्तपत्रात जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत यावी. तसेच अ.क्र.६ वरील महाराष्ट्र शासनाच्या जमिनीचा ताबा महानगरपालिकेकडे देणेबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस देखील मान्यता देणेत येत आहे.

11/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५.
दुरध्वनी 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स 0250-2525107.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. EEE

विभाग :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा
दिनांक :- १४/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विम्याचे नुतनीकरण करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पुर्व) ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (पश्चिम) ५) सनसीटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (पश्चिम) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई अशी मिळुन एकुण ०७ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागात कायम व ठेका कर्मचारी असे एकुण २२६ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच समुद्र किनारी पर्यटकांच्या सुरक्षेकरीता ९ जीवरक्षक कार्यरत आहेत. असे एकुण २३५ कर्मचारी आपल्या जीवाची जोखीम पत्क्ररुन कर्तव्य बजावत आहेत. सदर कर्मचारी संपूर्ण वसई तालुका, भिवंडी, पालघर, बोईसर, एम.आय.डी.सी, नॅशनल हायवे, डहाणू, तलासरी, ई. ठिकाणी रासायनिक व इतर कंपन्यांमध्ये लागणाऱ्या आगी तसेच रहीवाशी इमारती मध्ये लागणाऱ्या आगी विझवणे व त्या ठिकाणी आगीत सापडलेल्या व्यक्तीचे व त्यांचे मालमत्तेचे आगी पासुन संरक्षण करणे तसेच झाड पडणे, अतिवृष्टीमुळे पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होणे अशा आणिबाणीच्या वेळी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात हे कर्मचारी सदरची कामे करत आहेत. अशा आणीबाणीच्या परिस्थितीत काम करत असतांना अग्निशमन जवानांना दुखापती सुध्दा होत असतात.

आग विझवित असतांना कर्मचा-यांना इजा, दुखापत अथवा दुर्देवी प्रसंग ओढावल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास मृत जवानांचे कुटूंब उघडयावर पडू नये व त्यांच्या वारसांना सुरक्षा म्हणुन काही रक्कम मिळणे आवश्यक आहे. अशी रक्कम मिळणेसाठी अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा उतरविणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील कार्यरत १४ कायम कर्मचारी व १६५ ठेका कर्मचारी यांचा वार्षिक ग्रुप विमा मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८२१, दिनांक २८/०८/२०१४ रोजी मंजुरी घेऊन दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचेकडून अग्निशमन विभागातील कायम व ठेका अशा एकुण १७९ कर्मचा-यांचा ग्रुप विमा दिनांक ०३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. तसेच मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दिनांक २३/०३/२०१५ अन्वये दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचे कडून अग्निशमन विभागाच्या उर्वरीत ५८ कर्मचा-यांचा अपघाती विमा दिनांक ३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. अशा एकुण २३७ अग्निशमन कर्मचा-यांचा विमा काढण्यात आला होता.

सदर विमा योजनेअंतर्गत विमाधारक कर्मचा-यास अपघात दुखापत झाल्यास संभाव्य वैदयकिय खर्चाची रक्कम केलेल्या वैदयकिय खर्चाची बिले सादर केल्यानंतर सदर रक्कम त्यास विमा कंपनीकडून प्राप्त होते. तसेच एखादा विमाधारक कर्मचारी याचा अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास निश्चित एक रक्कम विमा कंपनीकडून देण्यात येते.

सदरील विमा पॉलिसीची वार्षिक नुतनीकरणाची मुदत हि दिनांक १५/०७/२०२५ रोजी संपत असून या विमा योजने लाभा अंतर्गत कार्यरत २३५ कर्मचा-यांची यादी दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी यांना कळविले आहे त्या अनुषंगाने विमा रक्कमेबाबत त्यांनी दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या पत्राने वार्षिक विमा हप्ताची एकुण रक्कम रु. २४,४१,२०६/- कळविली असून सदर रक्कम भरणेस कळविलेले आहे.

तरी सदर पॉलिसीचे नुतनीकरण करणे करीता महानगरपालिकेचे सुधारित अर्थसंकल्प २०२४-२५ सह सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३३ वर १३ नंबर लेखाशिर्ष **'अग्निशमन विमा कर्मचारी'** यामध्ये एकुण वार्षिक रक्कम रुपये १ कोटी एवढी तरतुद आहे.

तरी अग्निशमन विभागातील कायम व ठेका पध्दतीवरील कर्मचारी यांच्या अपघाती ग्रुप विमा पॉलिसीचे नुतनीकरण करण्यास व त्याबाबत येणाऱ्या रक्कम रु. २४,४१,२०६/- पर्यंतचे खर्चास मा. आयुक्त सो. यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील कर्मचारी यांचे अपघाती ग्रुप विमा पॉलिसीचे नुतनीकरण करण्यास व त्याबाबत येणा-या रक्कम रु. २४,४१,२०६/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

14/0>

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९९७ विभाग :- मालमत्ता व्यवस्थापन
दिनांक :- १४/०७ / २०२५

प्रस्तावाचा विषय :- मौजे उमेळे, ता.वसई, जि.पालघर येथील स. नं ९९/१ "सरकारी खांजण" जागेपैकी २०२२१ चौ.मी. क्षेत्र महापालिकेस मलनि:स्सारण केंद्र (Sewage Treatment Plant) करीता वर्ग करण्याचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे सादर करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, सदर प्रकरणी प्र. कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.वविशम/पा.पु/७७३/२०२४ दि.१९/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये गाव मौजे - उमेळे , स.नं.९९ पैकी क्षेत्र ५८.४७.०० चौ.मी जागेपैकी १० एकर जागेमध्ये मलनिस्सारण केंद्र (Sewage Treatment Plant Zone - 6) उभारण्यासाठी मलनि:स्सारण विभागास जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आली आहे.

गाव उमेळे सर्वे नं.९९/१ या जागेच्या ७/१२ वर "सरकारी खांजण" अशी नोंद आहे. सदर जागेची मालकी ही शासनाची आहे. त्याचप्रमाणे इतर अधिकार मध्ये सदर मिळकतीपैकी ६० एकर क्षेत्र हे चेअरमन, तिल्हेर आ.जंगल कामगार सो., ता.वसई यांना मीठागरासाठी व ६० एकर क्षेत्र हे चेअरमन, मेढे भाताणे आदी.जंगल कामगार सो. लि. बेलवाडी, ता.वसई यांना मीठागरासाठी २५ वर्षाच्या भाडेकरारावर दिल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि मौजे उमेळे सर्व्हे क्र.९९/१ एकूण क्षेत्र ५८.७४.०० हे.आर.चौ.मी (१४५ एकर) इतके असून त्यापैकी १२० एकर जमिन ही मिठ उत्पादनाकरीता भाडेतत्वावर देण्यात आली असून उर्वरीत २५ एकर इतकी जागा मोकळी असल्याचे निदर्शनास येत आहे.

मौजे उमेळे सर्व्हे क्र.९९/१ च्या ७/१२ उतारा वरील नमुद फेरफार क्र.१००९ चे अवलोकन केले असता सदर मिळकत ही दि.२२/०९/१९८१ रोजी २५ वर्षासाठी आदिवासी जंगल कामगार संस्थाना मिठागरासाठी भाडेतत्वावर देण्यात आली आहे व सदर उपलब्ध कागदपत्रानुसार सद्यस्थितीत सदरचा भाडेकरार हा संपूष्टात आल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. गाव मौजे उमेळे सर्वे नं.९९/१ एकूण क्षेत्र ५८.७४.०० हे.आर.चौ.मी पैकी २०२२१ चौ.मी. इतक्या मोकळया जागेत मलनि:स्सारण प्रकल्प उभारण्याचा महापालिकेचा मानस आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात नसल्याने मा. राष्ट्रीय हरीत लवादाकडे दाखल याचिकेवर दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने माहे एप्रिल, २०१९ पासून रु.०.१० प्रती लिटर प्रतिदिन इतका दंड आकारला आहे. मा. राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशा विरुध्द महापालिकेने Special leave application Hon. Apex Court येथे दाखल केले आहे. सदर दाखल अपीलावर मा. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी दरम्यान महापालिकेने उर्वरीत भागात मलनि:स्सारण केंद्र उभारण्याचे निर्देश दिले आहेत.

उक्त सुनावणी करीता दृकश्राव्य प्रणाली (VC) व्दारे मा. प्रधान सचिव -२, नगर विकास विभाग यांनी साक्ष दिली आहे. महापालिकेने सादर केलेल्या मलनि:स्सारण प्रकल्पाच्या कामांना राज्य शासनाने मंजूरी देऊन अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. प्राप्त निर्देशानुसार

महापालिकेने नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत STP Zone - ६ साठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास नगरोत्थान अंतर्गत मान्यता देण्यासाठी दि.१७/०४/२०२५ रोजी झालेल्या मा.राज्य स्तरिय तांत्रिक समितीच्या बैठकीत शिफारस करण्यात आली आहे. याबाबतचा शासन प्रशासकीय आदेश / निर्णय लवकरच निर्गमित होणे अपेक्षीत आहे.

सदर प्रकरणी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे कलम ४.११ (iv) अन्वये ना विकास क्षेत्रामध्ये मलनि:स्सारण केंद्र (Sewage Treatment Plant) चा वापर अनुज्ञेय असून पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांचेकडील दि.१८/०१/२०१९ रोजीच्या सुचनेनुसार CRZ - II क्षेत्रामध्ये मलनि:स्सारण केंद्र (Sewage Treatment Plant) चा वापर अनुज्ञेय असल्याचे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० आणि पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांचेकडील दि.१८/०१/२०१९ रोजीच्या सुचनेनुसार दिसून येते. त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.१७/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या Wetland Brief Document मध्ये सदरची मिळकत समाविष्ट नसल्याचे आढळून येत आहे.

शासकीय जागेचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.२७/०७/२०११ अन्वये संबंधीत जिल्हाधिकरी यांना देण्यात आले असून मौजे उमेळे, ता.वसई, जि.पालघर येथील सं. नं ९९/१ मध्ये मलनि:स्सारण केंद्रा उभारण्याकरीता आवश्यक असलेले २०२२१ चौ.मी. इतके जागेचे क्षेत्र वसई विरार शहर महानगरपालिकेस वर्ग करणेकामी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पालघर यांना विवरण पत्र अ,ब,क,ड मध्ये माहिती भरून जागा माहिती प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

सदर जागा मागणी प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता अूसन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२-अ मधील तरतुदी नुसार शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली आहे. प्रशासकांचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान आहेत.

तरी मौजे उमेळे, ता.वसई, जि.पालघर येथील सं. नं ९९/१ मधील फेरफार क्र.१००९ नुसार भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मिळकतीचा करार संपुष्टात आला असल्यास भाडेकराराचे नुतनीकरण करण्यात येऊ नये तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेस मलनि:स्सारण केंद्र उभारण्या करीता २०२२१ चौ.मी. इतके क्षेत्र वर्ग करण्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे विवरण पत्र अ, ब, क, ड मध्ये माहिती भरुन प्रस्ताव पाठविण्याकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय :-

१. मौजे उमेळे सर्वे नं.९९/१ एकूण क्षेत्र ५८.७४.०० हे.आर.चौ.मी पैकी २०२२१ चौ.मी. इतक्या मोकळ्या असलेल्या जागेत मलनि:स्सारण प्रकल्प उभारण्याचा महापालिकेचा मानस आहे .

२. उमेळे सर्वे नं.९९/१ एकूण क्षेत्र १४५ एकर असून या जागेच्या ७/१२ वर "सरकारी खांजण" अशी नोंद आहे. सदर जागेच्या ७/१२ उतारा वरील नमुद फेरफार क्र.१००९ चे अवलोकन केले असता सदर मिळकतीपैकी ६० एकर क्षेत्र हे चेअरमन, तिल्हेर आदी. जंगल कामगार सो., ता.वसई यांना मीठागरासाठी व ६० एकर क्षेत्र हे चेअरमन, मेढे भाताणे आदी. जंगल कामगार सो. लि. बेलवाडी, ता.वसई यांना मीठागरासाठी असे १२० एकर क्षेत्र दि.२२/०९/१९८१ च्या भाडे करारानुसार २५ वर्षाकरीता देण्यात आले आहे. तसेच २५ एकर जागा मोकळी आहे. सद्य:स्थितीत सदर भाडेकरार हा संपूष्टात आला असल्याचे दिसून येते.

३. गाव उमेळे सर्वे नं.९९/१ हे क्षेत्र नाविकास क्षेत्र (NDZ) म्हणून वसई-विरार उप प्रदेशाच्या मंजूर विकास आराखड्यात दर्शविलेले आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे कलम

४.११ (iv) अन्वये ना विकास क्षेत्रामध्ये मलनि:स्सारण केंद्र (Sewage Treatment Plant) चा वापर अनुज्ञेय असून पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांचेकडील दि.१८/०१/२०१९ रोजीच्या सुचनेनुसार CRZ - II क्षेत्रामध्ये मलनि:स्सारण केंद्र (Sewage Treatment Plant) चा वापर अनुज्ञेय असल्याचे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० आणि पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांचेकडील दि.१८/०१/२०१९ रोजीच्या सुचनेनुसार दिसून येते. त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.१७/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या Wetland Brief Document मध्ये सदरची मिळकत समाविष्ट नसल्याचे आढळून येत आहे.

४. उक्त तरतुदी विचारात घेता मौजे उमेळे सर्वे नं. ९९/१ मधील एकूण क्षेत्र ५८.७४.०० हे.आर. पैकी २०२२१ चौ.मी. इतकी सरकारी खांजण मोकळी असलेली जागा मलनि:स्सारण प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने महापालिकेस हस्तांतरीत करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्याकामी मालमत्ता व्यवस्थापन विभागाने पाठपुरावा करावा व जागा हस्तांतरीत झाल्यानंतर सदर जागा मलनिस्सारण विभागाकडे तातडीने प्रकल्पांच्या कामांकरीता हस्तांतरीत करावी.

१५/०७/२५

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स 0250-2525107.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ६६८

विभाग :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा
दिनांक :- १४/७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील कर्मचा-यांकरीता रेनकोट दरपत्रक प्रक्रिया करुन खरेदी करणेस व येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ३) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ४) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ६) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ७) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव अशी मिळून एकुण ७ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. ८) वसई फाटा अग्निशमन केंद्र, वसई फाटा सदर ठिकाणी ४५ अग्निशमन वाहने कार्यरत आहेत. तसेच अग्निशमन विभागाकरीता १७७ फायरमन व ४१ वाहनचालक असे एकुण २१८ कंत्राटी कर्मचारी असून ८ कायम आस्थापनेवरील कर्मचारी २४x७ सेवा बजावत आहेत. तसेच महानगरपालिका हद्दीतील १) राजोडी २) भास्कर आळी (सुरुची बाग) ३) भुईगाव इत्यादी समुद्रकिना-यावर ०९ जीवरक्षक कार्यरत आहेत. असे एकुण २३५ कर्मचारी अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागात कार्यरत आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये येणा-या मान्सून काळात तसेच इतर नैसर्गिक आपत्ती पूर परिस्थितीत अग्निशमन कर्मचारी यांना वर्दीवर काम करतांना रेनकोट व गमबुटची आवश्यकता असते. पावसाळयात चक्री वादळ, प्रचंड वेगाने वाहणारे वारे यामुळे झाडांची पडझड होऊन मोठया प्रमाणात दुर्घटना घडतात. सदर झाडे ही घरावर, इमारतीवर, रस्त्यावर, विजेच्या तारांवर, टांन्सफॉर्मरवर, वाहनांवर इत्यांदींवर पडल्याने नागरिकांच्या जिवीताचे व मालमत्तेचे मोठया प्रमाणत नुकसान होते. प्रसंगी मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होते. पावसाळयात अशा आपत्कालीन परिस्थितीत काम करतांना अग्निशमन कर्मचारी यांना रेनकोट व गमबुट दिल्यास त्यांचें पावसापासून संरक्षण होईल. तसेच सदर कर्मचारी पावसामुळे आजारी पडणार नाहीत तसेच त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होऊन ते अत्यंत कुशलतेने वर्दीवर काम करु शकतील.

सदर अग्निशमन कर्मचा-यांना पावसाळयात रेनकोट व गमबुट खरेदी करणे आवश्यक़ आहे. सदर अग्निशमन कर्मचारी यांचे करीता सन २०२४ मध्ये दरपत्रक प्रक्रिया करुन रेनकोट व गमबुट यापुर्वी खरेदी करण्यात आले होते. परंतु सदर रेनकोट व गमबुट खराब व फाटले असल्यामुळे अग्निशमन कर्मचारी यांना नविन रेनकोट व गमबुट खरेदी करणे आवश्यक आहे. सदर रेनकोट व गमबुट हे शासनाच्या GeM पोर्टलवर उपलब्ध दिसून येत नसल्याबाबतचा पुरावा सोबत पृष्ठ क्रं. ११ ते १३ वर जोडण्यात आला आहे.

त्यानुसार नविन रेनकोट व गमबुट खरेदी करणे कामी दरपत्रक मागविले असता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

Sr. No	Description	Qty.	M K Shah Enterprises	JRS Enterprises	K K Brothers
1	अग्निशमन कर्मचारी यांना रेनकोट खरेदी करणे बाबत		Including GST 18%		
		01	2065/-	**1945/-**	2006/-
2	अग्निशमन कर्मचारी यांना गमबुट खरेदी करणे बाबत	01	1475/-	**1360/-**	1416/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त कमी दराचे दरपत्रकानुसार प्रति रेनकोट खरेदी करणे कामी वस्तु व सेवा करासह अंदाजित रक्क़म रु. १९४५/- खर्च येत असून २३५ कर्मचा-यांकरीता रेनकोट खरेदी करणे कामी अंदाजित रक्क़म रु. ४,५७,०७५/- खर्च अपेक्षित आहे. तसेच प्रती गमबुट खरेदी करणे कामी वस्तु व सेवा करासह अंदाजीत रक्क़म रु. १३६०/- खर्च येत असून २३५ कर्मचा-यांकरीता गमबुट खरेदी करणे कामी अंदाजीत रक्क़म रु. ३,१९,६००/- खर्च अपेक्षित आहे. तरी रेनकोट व गमबुट खरेदी करणे कामी एकुण रक्क़म रु. ७,७६,६७५/- खर्च अपेक्षित आहे.

सदर रेनकोट व गमबुट खरेदी करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिका सुधारीत अर्थसंकल्प २०२४-२०२५ सह सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील पान नं. ३१ वरील ४ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी / गणवेश खरेदी** यामध्ये रक्क़म रु. १० कोटी तरतूद असून सदर खर्च यामधून करता येईल.

सदर दरपत्रक प्रक्रिया पुढील नमूद कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्रं.	तपशिल / बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तिय मान्यता ठराव	सक्षम अधिका-याकडून मंजूर मिळाल्यानंतर तात्काळ
२	करारनामा करणे	२३/०७/२०२५
३	कार्यादेश	२४/०७/२०२५
४	काम पुर्ण करणे	०२/०८/२०२५
५	देयक सादर करणे	०३/०८/२०२५
६	देयकाचे प्रदान करणे	१०/०८/२०२५

तरी अग्निशमन विभागातील कर्मचा-यांकरीता रेनकोट व गमबुट दरपत्रक प्रक्रिया करुन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजित रक्कम रु. ७,७६,६७५/- पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मा.आयुक्त सो. यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारीव त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिका-याची मंजूर घेणे बंधनकारक असेल.

अ.क्रं.	तपशिल / बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तिय मान्यता ठराव	सक्षम अधिका-याकडून मंजूर मिळाल्यानंतर तात्काळ
२	करारनामा करणे	२३/०७/२०२५
३	कार्यादेश	२४/०७/२०२५
४	काम पुर्ण करणे	०२/०८/२०२५
५	देयक सादर करणे	०३/०८/२०२५
६	देयकाचे प्रदान करणे	१०/०८/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातील कर्मचा-यांकरीता रेनकोट व गमबुट खरेदी करणे कामी येणा-या रक्कम रु. ७,७६,६७५/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

14/07

अनिलकुमार पवार(भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.पालघर, पिन नं.४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र. eee

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/२०२५

मुख्य प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र. २० मध्ये स्टेशन जवळील लक्ष्मी कुटीर बिल्डिंग ते सरस्वती विद्यामंदिराजळील मुख्य गटारापर्यंत आर.सी.सी गटार बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.**

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३६,४०,३३०/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.२३७ दि.०७/०५/२०२५

३) तांत्रिक मान्यता :- प्र.शहर अभियंता पु.क्र.३/१५ सन २०२५-२६ दि.०८/०५/२०२५

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ३६,४०,३३०/-

५) ई-टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/बांध/२७८/२०२५ दि.०९/०५/२०२५ प्र.शहर अभियंता, व.वि.श.म.

६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक. :- दि.१०/०५/२०२५

७) जाहिर निविदा सुचना :- १. दै.आपला महानगर २. दै.वृत्तमानस ३. दै. खबरे आज तक ४. दै. परशुराम समाचार

८) ई-निविदा प्राप्त :- ०९

९) ई- निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.२२/०५/२०२५

१०) ई- निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.१२/०६/२०२५

११) प्राप्त निविदांची संख्या :- ०८

१२) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील	शेरा
१.	मे. साई पोमू कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २१.००% कमी दराने	--	पात्र
२.	मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २२.००% कमी दराने	--	पात्र
३.	मे. सानीया एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) ०.१०% कमी दराने	--	पात्र
४.	मे. साईराज एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) १८.३२% कमी दराने	--	पात्र
५.	मे. नेवाळकर एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा ८.००% जादा दराने	--	पात्र
६.	मे. मेहूल अरविंद वर्तक	अंदाजपत्रकिय दराने	--	पात्र
७.	मे. जोजल जोसेफ लोपिस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) २०.००% कमी दराने	--	पात्र
८.	मे. ए.जी. पाटील	अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३.००% जादा दराने	--	पात्र

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकापेक्षा (-) २२.०० % कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

याकामी खालील विहित करुन देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.०७/०५/२०२५
२.	शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेणे.	दि.०८/०५/२०२५
३.	निविदा प्रसिद्ध करणे	दि.१०/०५/२०२३
४.	प्रथम लिफाफा उघडणे	दि.२२/०५/२०२५
५.	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०३/०१/२०२५
६.	संविदा मंजूरी ठराव	दि.१८/०७/२०२५
७.	कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.२५/०७/२०२५
८.	काम सुरु करणे	दि.२८/०७/२०२५
९.	काम पूर्ण करणे	दि.२८/०८/२०२५
१०.	देयक सादर करणे	दि.०४/०९/२०२५
११.	देयकाचे प्रदान करणे	दि.१५/०९/२०२५

ठराव / निर्णय :- सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.०७/०५/२०२५
२.	शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेणे.	दि.०८/०५/२०२५
३.	निविदा प्रसिद्ध करणे	दि.१०/०५/२०२३
४.	प्रथम लिफाफा उघडणे	दि.२२/०५/२०२५
५.	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०३/०१/२०२५
६.	संविदा मंजूरी ठराव	दि.१८/०७/२०२५
७.	कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.२५/०७/२०२५
८.	काम सुरु करणे	दि.२८/०७/२०२५
९.	काम पूर्ण करणे	दि.२८/०८/२०२५
१०.	देयक सादर करणे	दि.०४/०९/२०२५
११.	देयकाचे प्रदान करणे	दि.१५/०९/२०२५

सदर कामाकरीता उपरोक्त नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR 1979 प्रमाणेकार्यवाहीस पात्र राहतील.

प्रस्तावित कालमर्यादेत तांत्रिक अथवा प्रशासकीय कारणास्तव तसेच नैसर्गिक आपत्ती व इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब झाल्यास नमूद कारणासह सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील. तरी प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील **वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र. २० मध्ये स्टेशन जवळील लक्ष्मी कुटीर बिल्डिंग ते सरस्वती विद्यामंदिराजळील मुख्य गटारापर्यंत आर.सी.सी गटार बांधणे** या कामास आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. **२३७ दि.०७/०५/२०२५** अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्टया पाहता **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** ह्यांचे **अंदाजपत्रकापेक्षा (-) २२.००% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** ह्यांना **अंदाजपत्रकापेक्षा (-) २२.००% कमी दराने** काम करणेस, कार्यादेश देणेस, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणे मान्यता देत आहेत. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्यावरील केलेल्या कामाचे Geo-Tagged फोटोग्राफ्स सादर करणे आवश्यक राहील तद्नंतरच कामाचे बील अदा करणेत यावे.

11/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८७७

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक :- १४/०७/२०२५

मुख्य प्रस्तावाचा विषय :- :- **प्रभाग समिती 'ए' बोळींज विरार (प.) प्रभाग क्र.३१ मध्ये नॅशनल इंग्लिश स्कुल समोरील फुटपाथाची उंची वाढविणे या कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.**

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३२,३०,६२३/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.१८८६ दि.१३/१०/२०२३

३) तांत्रिक मान्यता :- कार्यकारी अभियंता पुक्र.१९/११३ सन २०२३-२४ दि.१३/१०/२०२३

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३२,३०,६२३/-

५) ई-टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :-वविशम/बांध/५५२/२० दि.०२/०२/२०२३ कार्यकारी अभियंता, व.वि.श.म

६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दि. :- दि.१४/०२/२०२३

७) जाहिर निविदा सुचना :- १) दै. जागल्या
२) दै.नवराष्ट्र
३) दै.The Free Press Journal

८) ई-निविदा प्राप्त :- ०४

९) ई- निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१६/०२/२०२४

१०) ई- निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.०९/०९/२०२४

११) प्राप्त मंजुर निविदांची संख्या :- ३

१२) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा १.९९% जास्त दराने	पात्र
२.	मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ९.००% जास्त दराने	पात्र
३.	मे. निळकंठ एन्टरप्रायजेस	अंदाजपत्रकापेक्षा ८.००% जास्त दराने	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दर **मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा १.९९% जास्त दराने** निविदा ही कमी ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकापेक्षा १.९९% जास्त दराने** मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

याकामी खालील विहित करुन देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.१३/१०/२०२३
२.	कार्यकारी तथा शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेणे.	दि.१३/१०/२०२३
३.	निविदा प्रसिद्ध करणे	दि.१४/०२/२०२४
४.	प्रथम लिफाफा उघडणे	दि.१६/०२/२०२४
५.	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०९/०९/२०२४
६.	संविदा मंजूरी ठराव	दि.१५/०७/२०२५
७.	कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.२३/०७/२०२५
८.	काम सुरु करणे	दि.२४/०७/२०२५
९.	काम पूर्ण करणे	दि.२५/०८/२०२५
१०.	देयक सादर करणे	दि.०९/०९/२०२५
११.	देयकाचे प्रदान करणे	दि.१८/०९/२०२५

ठराव / निर्णय :- सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.१३/१०/२०२३
२.	कार्यकारी तथा शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेणे.	दि.१३/१०/२०२३
३.	निविदा प्रसिद्ध करणे	दि.१४/०२/२०२४
४.	प्रथम लिफाफा उघडणे	दि.१६/०२/२०२४
५.	द्वितीय लिफाफा उघडणे	दि.०९/०९/२०२४
६.	संविदा मंजूरी ठराव	दि.१५/०७/२०२५
७.	कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.२३/०७/२०२५
८.	काम सुरु करणे	दि.२४/०७/२०२५
९.	काम पूर्ण करणे	दि.२५/०८/२०२५
१०.	देयक सादर करणे	दि.०९/०९/२०२५
११.	देयकाचे प्रदान करणे	दि.१८/०९/२०२५

सदर कामाकरीता उपरोक्त नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR 1979 प्रमाणेकार्यवाहीस पात्र राहतील.

प्रस्तावित कालमर्यादेत तांत्रिक अथवा प्रशासकीय कारणास्तव तसेच नैसर्गिक आपत्ती व इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे विलंब झाल्यास नमूद कारणासह सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक राहील. तरी प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील **प्रभाग समिती 'ए' बोळींज विरार (प.) प्रभाग क्र.३१ मध्ये नॅशनल इंग्लिश स्कुल समोरील फुटपाथाची उंची वाढविणे** या कामास **आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.१८८६ दि.१३/१०/२०२३** अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्टया पाहता **मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन** ह्यांचे **अंदाजपत्रकापेक्षा १.९९% जास्त दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे. श्री साई गणेश कंन्स्ट्रक्शन** ह्यांना **अंदाजपत्रकापेक्षा १.९९% जास्त दराने** काम करणेस, कार्यादेश देणेस, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणे मान्यता देत आहेत. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्यावरील केलेल्या कामाचे Geo-Tagged फोटोग्राफ्स सादर करणे आवश्यक राहील तद्नंतरच कामाचे बील अदा करणेत यावे.

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ ,फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८७१

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २४/०७/ २०२५

---

१. प्रस्तावाचा विषय	:-	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. ४७ मधील नगीनदासपाडा येथील राम रहीम नगर चाळ येथे सी.सी. गटार बांधणे.
ठरावाचा निर्णय :- केंद्र व राज्य सरकारे या कडील विविध योजना अनुदाने, त्याच प्रमाणे इतर वित्तीय बाबी करीता महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद लेख पध्दतीत असणे क्रमप्राप्त आहेत. सदरचे द्विनोंद लेखा पध्दतीनुसार तयार होणारे वार्षिक लेखे या मध्ये ताळेबंद (Balance sheet) व इतर सहपत्रे ही प्रथम एका सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) कडून तयार करुन अंतिम करणे व दुसऱ्या सनदी लेखापाल यांच्या कडून ती लेखापरिक्षण करुन घेणे बाबतीत बंधनकारक केले आहे. केंद्र व राज्य शासनाकडील, वित्त आयोगाकडील अनुदाने त्याच प्रमाणे वित्तीय अर्थसहाय्य या करीता आवश्यक वित्तीय माहिती करीता तसेच महानगरपालिकेचे पतमानांकनाकरीता आवश्यक आहे.

वर्ष अखेर लेखा नोंदी तपासुन द्विनोंद लेखा पध्दती नुसार वार्षिक लेखे यामध्ये ताळेबंद, उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे तयार करुन अंतिम करुन मसुदा ताळेबंद सादर करणे या कामी एक सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) व अंतिम केलेले वार्षिक लेखे लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण अहवालासह सादर करणे कामी दुसरा सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) नेमणे आवश्यक आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे द्विनोंद लेखापध्दती नुसार तयार करण्यात आलेले मसुदा वार्षिक लेखे ताळेबंद (Balance sheet) उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण अहवालासह सादर करणे कामी सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) यांची नेमणुक 15 वा वित्त आयोगाच्या अनुदाना करीता सदरची माहिती **सिटी फायनान्स पोर्टलवर (City Finance portal) तातडीने अपलोड करणे आवश्यक** असल्याने सदरचे काम करणे कामी **मे. क्रिस्टल लोपीस, सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट)** यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करणे आवश्क आहे.

सदर कामासाठी रक्कम रुपये रु. 7,00,000/- लक्ष + रु. 1,26,000/- जी.एस.टी 18% असे एकूण रक्कम रु. 8,26,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष सामान्य प्रशासन द्विनोंद लेखा पध्दती अंमलबजावणीसह सनदी लेखापाल खर्च यातून भागविणे शक्य आहे सदर लेखाशिर्ष वर सन 2023/24 करीता रक्कम रु. 300 कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

मे. क्रिस्टल लोपीस, सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करणे कामी रक्कम रु. 8,26,000/- जी.एस.टी. सह होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

कलम 452 क नुसार प्रशासक म्हणून असलेल्या अधिकारान्वये प्रशासकिय ठरावाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहेत.

ठरावाचा निर्णय :- सन 2023/24 या वित्तीय वर्षाचे द्विनोंद लेखापध्दती नुसार तयार करण्यात आलेले मसुदा वार्षिक लेखे ताळेबंद (Balance sheet) उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण अहवालासह सादर करणे कामी **मे. क्रिस्टल लोपीस, सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंटन्ट)** यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करणे करण्यांत येते आहे. तसेच रक्कम रु. 8,26,000/- जी.एस.टी. सह होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय देण्यात येत आहेत.

17/10

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (पश्चिम), जि. पालघर पिन नं 401303
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 1004

विभाग : मुख्यालय लेखा विभाग
दिनांक : 17/07/2025

ठरावाचा विषय :- सन 2024/25 या वर्षा अखेरच्या लेखा नोंदी तपासुन द्विनोंद लेखा पध्दती नुसार वार्षिक लेखे यामध्ये ताळेबंद, उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे तयार करुन अंतिम करणे व द्विनोंद पध्दतीचे मसुदा वार्षिक लेखे सादर करणे कामी सनदी लेखापाल (C.A) यांची नेमणुक करणे.

ठरावाचा मजकुर:- केंद्र व राज्य सरकारे या कडील विविध योजना अनुदाने, त्याच प्रमाणे इतर वित्तीय बाबी करीता महानगरपालिकेचे लेखे द्विनोंद लेख पध्दतीत असणे क्रमप्राप्त आहेत. सदरचे द्विनोंद लेखा पध्दतीनुसार तयार होणारे वार्षिक लेखे या मध्ये ताळेबंद (Balance sheet) व इतर सहपत्रे ही प्रथम एका सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) कडून तयार करुन अंतिम करणे व दुसऱ्या सनदी लेखापाल यांच्या कडून ती लेखापरिक्षण करुन घेणे बाबतीत बंधनकारक केले आहे. केंद्र व राज्य शासनाकडील, वित्त आयोगाकडील अनुदाने त्याच प्रमाणे वित्तीय अर्थसहाय्य या करीता आवश्यक वित्तीय माहिती करीता तसेच महानगरपालिकेचे पतमानांकनाकरीता आवश्यक आहे.

वर्ष अखेर लेखा नोंदी तपासुन द्विनोंद लेखा पध्दती नुसार वार्षिक लेखे यामध्ये ताळेबंद, उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे तयार करुन अंतिम करुन मसुदा ताळेबंद सादर करणे या कामी एक सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) नेमणे आवश्यक आहे. सदरची माहिती **सिटी फायनान्स पोर्टलवर (City Finance portal) तातडीने अपलोड करणे आवश्यक** असल्याने **मे. शुभम कॉमर्स प्रा.लि. सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट)** यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करणे आवश्क आहे.

सदर कामासाठी रक्कम रुपये रु. 7,00,000/- लक्ष + रु. 1,26,000/- जी.एस.टी 18% असे एकूण रक्कम रु. 8,26,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष सामान्य प्रशासन द्विनोंद लेखा पध्दती अंमलबजावणीसह सनदी लेखापाल खर्च यातून भागविणे शक्य आहे सदर लेखाशिर्ष वर सन 2024/25 करीता रक्कम रु. 300 कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

मे. शुभम कॉमर्स प्रा.लि. सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट) यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करणे कामी रक्कम रु. 8,26,000/- जी.एस.टी. सह होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 452 क नुसार प्रशासक म्हणून असलेल्या अधिकारान्वये प्रशासकिय ठरावाद्वारे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहेत.

ठरावाचा निर्णय :- सन 2024/25 या वर्षा अखेरच्या लेखा नोंदी तपासुन द्विनोंद लेखा पध्दती नुसार वार्षिक लेखे यामध्ये ताळेबंद, उत्पन्न व खर्च पत्रक कॅश फ्लो स्टेटमेंट सह इतर सहपत्रे तयार करुन अंतिम करणे व द्विनोंद पध्दतीचे मसुदा वार्षिक लेखे सादर करणे कामी **मे. शुभम कॉमर्स प्रा.लि. सनदी लेखापाल (चार्टर्न्ट अकाऊंटन्ट)** यांची नियुक्ती 5:2:2 अन्वये करण्यात येत आहे. व सदर कामी रक्कम रु. 8,26,000/- जी.एस.टी. सह होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय देण्यात येत आहेत.

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती (बी) विरार पुर्व
दैनिक बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र. १००५ दि.१७/७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (बी) विरार पुर्व कार्यक्षेत्रातील तुळीज बाजार कर वसुलीस मुदतवाढीस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते की वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) विरार पूर्व, कार्यक्षेत्रातील तुळींज दैनिक बाजार कर वसुलीचा ठेका सन २०२१ ते २०२४ या कालावधी करिता मा. प्रशासकीय ठराव क्र.४३० दि.०२/०८/२०२१ अन्वये मे.बाबा कंन्स्ट्रक्शन यांचे नावे रक्कम रु.२,६९,४०,२०४/- (३० महिने) या रक्कमेवर मंजूर करण्यात आलेला होता. सदर ठेक्याची मुदत दि.३१ मार्च २०२४ रोजी संपली असून कोरोनामुळे शासनाने लॉकडाऊन जाहिर केला त्यामुळे काही कालावधीमध्ये ठेकेदारास दैनिक बाजार फी वसुली करता आलेली नाही. सदर लॉकडाऊन कालावधीत बाजार बंद असल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांनी मा. प्रशासकीय ठराव १) दैनिक बाजार फी सुट बाबतचा मा. प्रशासकीय ठराव क्र. ३६२ दि.१९/०७/२०२१, २) दैनिक बाजार फी सुट बाबतचा मा. प्रशासकीय ठराव क्र.८६९ दि.११/१२/२०२१, ३) दैनिक बाजार फी सुट बाबतचा मा. प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि.२१/०३/२०२२ व ४) दैनिक बाजार फी सुट बाबतचा मा. प्रशासकीय ठराव क्र.४४७ दि.१५/०६/२०२२ मुदतवाढीस मंजूरी दिलेली होती त्यानुसार मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना जा.क्र./६१/दे.बा.फी / दि.२०/०९/२०२२ अन्वये मा.उपायुक्त (दै.बा.फी) यांच्या आदेशानुसार एकुण ६ महिने १५ दिवसांची बाजार फी वसुलीस विनामुल्य मुदतवाढ देण्यात आली होती त्या अनुषंगाने मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना मुदतवाढ देण्यात येणारा कालावधी दि.१ एप्रिल २०२४ ते १५ ऑक्टोबर २०२४ असा आहे.

परंतू सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण ५ महिने १६ दिवस म्हणजेच १६ ऑक्टोबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीकरीता ई-निविदा करणे उचित वाटत नाही तरी संपूर्ण आर्थिक वर्षे गृहित धरावयाच्या अनुषंगाने सदर बाजार कर वसुलीची ई-निविदा प्रक्रिया दि.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीनआर्थिक वर्षाकरीता होणे योग्य वाटते तसेच सद्यस्थितीत ई-निविदेस विलंब होत असल्याने मागील मंजूर ठेकेदार मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना मौखिक सुचनेनुसार ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तुळीज बाजार कर वसुलीला मुदतवाढ कार्यादेश दिल्यास बाजार कर फी वसुलीमध्ये कोणताही खंड पडणार नाही व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही.

सदर टिपणी फेर सादर करण्यात येते की तुळींज दैनिक बाजार कर वसूलीची ई निविदा प्रक्रिया करावयाच्या कार्यवाही करिता मागील सन २०२३-२०२४ मध्ये येणाऱ्या बाजाराची रक्कम वाढ करुन १,०७,७६,१८४/- या रक्कमेवर प्रति वर्षी १०% वाढ करुन ३ वर्षाच्या कालावधीकरिता होणाऱ्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	कालावधी	मागील रक्कम	१०% वाढ	एकूण रक्कम
१	१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६	१,०७,७६,०८४/-	१०,७७,६०८/-	१,१८,५३,६९३/-
२	१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७	१,१८,५३,३९३/-	११,८५,३६९/-	१,३०,३९,०६३/-
३	१ एप्रिल २०२७ ते ३१ मार्च २०२८	१,३०,३९,०६३/-	१३,०३,९०६/-	१,४३,४२,९७०/-
			एकूण	**३,९२,३५,७२६/-**

तरी उक्त नमुद तक्त्यातील रक्कमेच्या तपशिलानुसार दि. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ (३६ महिने) या कालावधीकरिता तुळींज दैनिक बाजार कर फी वसुली ठेका पध्दतीने देणेबाबत ही निविदा प्रक्रिया करणेकामी दैनिक वर्तमान पत्रात तसेच http:mahatender.gov.in या संकेतस्थळावर जाहिर ई निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेच्या प्रशासकीय मंजुरीस्तव फेर सादर करण्यात येत आहे.

तसेच ई-निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता असल्याने व बाजार कर वसुलीमध्ये खंड पडुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता दि. १६/१०/२०२४ ते दि.३१/०७/२०२५ (९ महिने १५ दिवस) पर्यंत तत्कालीन ठेकेदार मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना मुदतवाढ देणेबाबत मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी पूर्वलक्षी प्रमाणे दि.२०/०५/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी सदर मान्यतेनुसार तत्कालीन ठेकेदार यांची ९ महिने १५ दिवसाची एकूण रक्कम रु.८५,३१,०६७/- होत असून त्यापैकी रु. ४१,१५,८६५/-भरणा केलेली आहे व उर्वरित रक्कम रु. ४४,१५,२०२/ तत्कालीन ठेकेदारांकडून धनाकर्षाद्वारे वसुली करणेस व दि.१६/१०/२०२४ ते दि.३१/०७/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणेकामी ठरावावर सही होणेस विनंती.

निर्णय :- प्रभाग समिती (बी) विरार (पूर्व) कार्यक्षेत्रातील दैनंदिन कर वसुलीचा ठेका मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना दि.०१/१०२०२१ ते ३१/०३/२०२४ या कालावधीकरीता रक्कम रु.२,६९,४०,२०४/- देण्यांत आलेला असून तद्नंतर कोरोना काळातील लॉकडाउन मुळे दि.०१/०४/२०२४ ते दि.१५ ऑक्टोबर २०२४ (६ महिने १५ दिवस) पर्यंत विनामुल्य मुदतवाढ देण्यांत आली आहे. सदर मुदतवाढ दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी समाप्त झालेली आहे.

सबब दि.१६/१०/२०२४ ते दि.३१/०७/२०२५ (९ महिने १५ दिवस) या ९ महिने १५ दिवस करिता रक्कम रु.८५,३१,२६७/- धनाकर्षाने आगाऊ स्वरुपात भरणा करुन त्यावर १% आयकर (TCS) भरुन घेण्यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारात मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांना बाजार कर वसुली करीता मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (प) जि. पालघर, पिन न. ४०१३०३
दुरध्वनी क्र. ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र.:- ७००६ विभाग :- सार्व. बांधकाम

दिनांक : १७/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ उमेळमान येथे बहुउदेशीय इमारतीत पाण्याची टाकी बांधणे कामी आलेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मंजुरी देणे.

प्रस्तावाचा मजकुर

अंदाजपत्रकीय रक्कम	रु. २,८१,८८७/-
तांत्रीक अंदाजपत्रकीय रक्कम	रु. २,८१,८८७/-
प्रशासकीय मंजुरी	आयुक्त तथा प्रशासक, ठराव क्र. ४११ दिनांक २८/०५/२०२५
तांत्रीक मंजुरी	कार्यकारी अभियंता पृ.क्र. ३/१८ दि. २९/०५/२०२५
निविदा प्रसिध्दी	वविशम/बांध/६६/२५ दि.०९/०६/२०२५ उप आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका
निविदा प्रसिध्दी दि.	दि. ०९/०६/२०२५ प्रभाग समिती एच कार्यालय नोटीस बोर्ड
निविदा फॉर्म विक्री दि.	दि. ०९.०६.२०२५ ते दि . १६.०६.२०२५
निविदा स्विकारण्याची तारीख	दि. १८.०६.२०२५
निविदा उघडण्याचा दिनांक (प्रथम लखोटा)	दि.१८.०६.२०२५
निविदा उघडण्याचा दिनांक (द्वितीय लखोटा)	दि.१९.०६.२०२५
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	उपआयुक्त परिमंडळ ६
लखोटा २ उघडण्याची मा. निविदा समितीने दि. १९/०६/२०२५ रोजी शिफारस केलेली आहे.	

प्राप्त निविदा समितीपुढे उघल्या असता त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकांचे नाव	निविदेतील दर	परफॉर्मन्स डी.डी	शेरा
१.	मे. बालाजी एन्टरप्रायझेस	अंदाजपत्रकीय दराने		
२.	मे. एस.एस. एन्टरप्रायझेस	२.००% जादा		
३.	मे. आर.व्ही.धोत्रे. कंस्ट्रक्शन	४.००% जादा		

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. बालाजी एन्टरप्रायझेस यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा इतर निविदेच्या तुलनेत कमी व वाजवी आहे. सदरच्या दरास निविदा समितीने दि. १९/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.तरी मे. बालाजी एन्टरप्रायझेस यांच्या अंदाजपत्रकीय दराची निविदा इतर निविदेच्या तुलनेत कमी व योग्य व वाजवी असुन मे. बालाजी एन्टरप्रायझेस हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव सादर त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अन्वये संविदा करणेसाठी आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मंजुरीस्तव सादर.

कामाबाबतचे बाबनिहाय वेळापत्रक

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	२८/०५/२०२५
२	निविदा प्रसिध्द करणे	०९/०६/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	१८/०६/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	१९/०६/२०२५
५	संविदा मंजूरी ठराव	१८/०७/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	२५/०७/२०२५
७	काम सुरु करणे	२८/०७/२०२५
८	काम पूर्ण करणे	२६/०८/२०२५
९	देयक सादर करणे	०२/०९/२०२५
१०	देयकाचे प्रदान करणे	०८/०९/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	१२/०९/२०२५

लघुत्तम निविदा धारक व दर बाबत विभागाचा अभिप्राय :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. बालाजी एन्टरप्रायझेस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दर तुलनात्मकरीत्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे. बालाजी एन्टरप्रायझेस यांच्या अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्याबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

ठराव निर्णय :-

सदर काम खालील नमुद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	२८/०५/२०२५
२	निविदा प्रसिध्द करणे	०९/०६/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	१८/०६/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	१९/०६/२०२५
५	संविदा मंजूरी ठराव	१८/०७/२०२५
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	२५/०७/२०२५
७	काम सुरु करणे	२८/०७/२०२५
८	काम पूर्ण करणे	२६/०८/२०२५
९	देयक सादर करणे	०२/०९/२०२५
१०	देयकाचे प्रदान करणे	०८/०९/२०२५
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	१२/०९/२०२५

सदर कामाकरिता नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रीक व नैसर्गिक व इतर सबक कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. तरी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०४ उमेळमान येथे बहुउदेशीय इमारतीत पाण्याची टाकी बांधणे या कामास आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. ४११ दिनांक २८/०५/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया पाहता मे. बालाजी एन्टरप्रायझेस हयांची अंदाजपत्रकीय दराची निविदा योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक मे. बालाजी एन्टरप्रायझेस हयांना अंदाजपत्रकीय दराने संविदा करणेस, कार्यादेश देणेस, काम करणेस मान्यता देत आहेत. तसेच Estimate मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geotagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तद्नंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प), जि.- पालघर, पिन नं. ४०१ ३०३

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७, ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय

ठराव क्र. १००७

विभाग :- पर्यावरण विभाग

दिनांक :-१७ /०७ /२०२५

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरण पुरक श्री.गणेश मूर्ती बनविणेकामी १००० (४०टन) गोणी शाडूची माती विनामुल्या पुरविणेसाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आगामी येणारे सण, उत्सव, पर्यावरण पुरक राबविणेसाठी तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या गणेश मूर्त्याचे नदी, तलाव,यासारख्या नैसर्गिक जलस्त्रोता मध्ये विर्सजन होत असल्याने जल प्रदूषणामुळे जैवविविधतेवर दुरगामी परिणाम होत आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पर्यावरण पुरक गणेशोत्सव, दुर्गापुजा यासारख्या सणांसाठी मुर्त्या ह्या पर्यावरण पुरक असणे आवश्यक आहे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ व उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार- वसई गणेश मुर्तिकार संस्था यांनी पर्यावरण पुरक मुर्त्या बनविणेच्या अनुषंगाने पत्रान्वये १००० मातीच्या गोण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या दि.३०/०६/२०२५ व ०१/०७/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे विनामुल्य शाडुची माती पुरविणेची मागणी केलेली आहे.

सदर शाडुमातीचे बाजार भावाचे दरपत्रक मागविले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

अ.क्र	तपशील	मे.साई माईन केमिकल (वडोदरा, गुजरात)	मे.अमर माईन केमिकल (भावनगर, गुजरात)	रानुजा आर्ट्स (नालासोपारा)
१	शाडुमाती ४० टन	७६,०००/-	८०,०००/-	२,४५,०००/-
२	वाहतुक खर्च ४० टन करीता	६८,०००/-	६७,६००/-	१२,०००/-
	एकूण (१+२)	१,४४,०००/-	१,४७,६००/-	२,५७,०००/-
	५% GST On (१+२)	७२००/-	७३८०/-	१२,८५०/-
	एकुण एकंदर खर्च	**१,५१,२००/-**	**१,५४,९८०/-**	**२,६९,८५०/-**

सदर शाडुमातीचे बाजार भावाचे दरपत्रक घेतले असता मे.साई माईन केमिकल (गुजरात, वडोदरा) यांचे दर कमी व रास्त असुन निम्नत्तम आहेत. तसेच

शाडु माती गाडी मधून उतरविणेकामी मजुरीकरिता अंदाजे रु.१२०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार कमी दराचे दरपत्रकानुसार व गोणी उतरविणेकामी होणारा खर्च पाहता खालीलप्रमाणे एकुण रु.१६३२००/- इतकर खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र	तपशील	प्रमाण	युनिट	दर	एकूण खर्च
१	शाडुमाती	४०	टन	१,९००/-	७६,०००/-
२	वाहतुक खर्च	४०	टन	१,७००/-	६८,०००/-
					१,४४,०००/-
				५% GST	७,२००/-
				एकूण	१,५१,२००/-
३	गोणी उतरविणेकामी होणारा अपेक्षित खर्च	४०	टन	३००/-	१२०००/-
				एकुण एकदंर खर्च	**१,६३,२००/-**

तरी उपरोक्त प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेस मे.साई माईन केमिकल यांनी १००० गोणी (४० टन) शाडुमाती गोण्या पुरविणेकामी एकूण रु.१,५१,२००/- चे कोटेशन दिलेले होते. तसेच वाहतुक होऊन येणारी माती उतरविणेकामी (unloading charges extra) खर्च रक्कम रु.१२,०००/- (बारा हजार) अतिरिक्त होणार आहे.सदर खर्चाचे श्री. सुभाष जाधव, वरीष्ठ लिपिक(स्थायी) यांचे नावे गोणी उतरविणेकामी होणारा खर्च रक्कम रु.१२,०००/- (अक्षरी :- बारा हजार रुपये मात्र)अग्रिम रक्कम देणेस मान्यता देण्यात यावी तसेच मे.साई माईन केमिकल यांनी शाडुमातीच्या व वाहतुक खर्चाच्या रु.१,५१,२००/- रक्कमेची अग्रिम मागणी केलेली आहे. त्यांना अग्रीम देणेकामी मंजूरी मिळावी.

तरी शाडुमाती खरेदी करणे तसेच ,गोणी उतरविणेकामी होणारा अपेक्षित खर्च अग्रिम स्वरुपात प्राप्त झाल्यास खरेदी व वितरण झाल्यानंतर सदर अग्रिम रक्कमेचे समायोजन करण्यात येईल. सदरचा होणारा खर्च रक्कम रु.१,६३,२००/- अग्रीम या लेखा शिर्षकामधुन करता येईल.

यावर्षी गणेश चतुर्थीचा सण दि.२७/०८/२०२५ रोजी असून मुर्तीकारांना लवकरात लवकर माती उपलब्ध करुन द्यावयाची असुन दरपत्रकाव्दारे खरेदी करणेच्या प्रक्रियेस कमी अवधी असल्याकारणाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण ५(२)(२) अन्वये दरपत्रक / निविदा न मागवता मे.साई माईन केमिकल यांचेकडुन थेट खरेदी करणेस तसेच होणारा खर्च

रक्कम रु.१,६३,२००/- (अक्षरी :- एक लक्ष त्रेसष्ठ हजार दोनशे रु.मात्र) इतक्या खर्चास मंजुरी मिळणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

ठरावाचा निर्णय :-

१) गणेश मुर्तिकाऱ्यांना १००० गोणी (४० टन) शाडु माती उपलब्ध करुन देणे कामी होणाऱ्या खर्च रु.१,६३,२००/- (अक्षरी :- एक लक्ष त्रेसष्ठ हजार दोनशे रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर कामी दरपत्रक / निविदा मागविणेची वेळेचा अभाव असल्याकारणाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण ५(२)(२) अन्वये दरपत्रक / निविदा न मागविता थेट मे.साई माईन केमिकल यांना रक्कम रु.१,५१,२००/- व श्री. सुभाष जाधव, वरीष्ठ लिपिक(स्थायी) यांचे नावे गोणी उतरविणेकामी होणारे रु.१२०००/- अग्रीम देणेस मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर कामी घेतलेल अग्रीम रक्कम खर्च रु.१,६३,२००/- या रक्कमेचे विहित मुदतीमध्ये समायोजन करणेची जबाबदारी पर्यावरण व प्रदुषण विभागाची राहील.

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. पालघर, पिन नं.४०१३०३

दुरध्वनी –०२५०-६८१४०००/६६३०००

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९००८ विभाग: स्मशानभूमी

दिनांक:१७/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- **सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच, आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूरः- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी निविदेचा मुदतवाढीचा कालावधी **दि.३१/०७/२०२५** रोजी संपुष्टात येत आहे. तरी सदर स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे यापुढे देखील करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील ठराव क्र.६१५ दि.०५/०६/२०२५ अन्वये २१३ इतक्या मनुष्यबळ करिता रु.२१,१२,०७,६९९/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत आली होती. त्या अनुषंगाने वविशम/स्मशानभूमी/४९/२०२५-२६ दि.१७/०६/२०२५ अन्वये सदर कामाची ई-निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. सदरची प्रसिद्ध केलेली ई-निविदामध्ये साहित्य सामुग्री पुरवठा करणेच्या दराचा समावेश केला नसल्याने तसेच काही त्रृटी असल्यामुळे ई-निविदा दि.०१/०७/२०२५ रोजीच्या मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूर टिपणीद्वारे रद्द करुन सदरची नवीन ई-निविदाची सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन नव्याने प्रसिद्ध करणेचे निर्देश देणेत आले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी सर्व सहा.आयुक्त ह्यांचे सद्यस्थितीतील अभिप्राय घेऊन शहरातील प्रभागनिहाय स्मशानभूमींची यादीप्रमाणे लागणारे मनुष्यबळांची संख्या त्यांच्यामार्फत सादर केली असून त्यामध्ये स्मशानभूमीसाठी लागणारे अकुशल संवर्गातील आवश्यक मनुष्यबळ व देखभाल करिता साहित्य पुरवठा करणेकामी किमान वेतनाच्या सध्याच्या मंजूर दराने वसई विरार शहर महानगरपालिकेचे सल्लागार मे. अनंत चौधरी, वेदांत लेबर लॉ सर्विसेस

यांचेकडील दि.३० जून २०२५ रोजीचे ई-मेल नुसार अपेक्षित मासिक खर्च यांची माहिती पुढील प्रमाणे.

No.	Particular	Unskilled Workers
1	Basic (Minimum Wages Act)	₹11,500
2	Dearness Allowance (DA)	₹9,100
3	Wage Amount (1 + 2)	₹20,600
4	HRA (5% of Wage, as per Workmen HRA Act, 1983)	₹1,030
5	Gross Amount (3 + 4)	₹21,630
6	EPF Contribution (Employer's share under EPF Act, 1952)	₹1,950
7	ESIC Contribution (3.25% of Gross as per ESIC Act, 1948)	₹0
8	Bonus (8.33% on Wages)	₹1,717
9	Leave Encashment	₹990
10	Maharashtra Labour Welfare Fund (MLWF)	₹12
11	Total	₹26,299
A)	Per-Day Rate	₹1,012
1)	Sweeping material, Equipment, Uniform, safety measures. (परिशिष्ट – अ)	₹50
	Estimated Rate Per Day / Per Labour (अंदाजपत्रकीय दर)	₹1062
B)	सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.(Upto 5.25%)	रु.----------
	एकूण (A+B)	₹1062

परिशिष्ट - अ

स्मशानभूमी करिता अकुशल मनुष्यबळ यांना आवश्यक सुरक्षा तथा देखभाल करिता साहित्य व वस्तू खालील प्रमाणे पुरवठा करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	तपशिल	अ.क्र.	तपशिल
१.	Disinfectants Liquid for hand cleaning	१३.	Juna (Scrubber)
२.	Soap	१४.	Urinal cubes
३.	Phenyl liquid	१५.	Wiper
४.	Naphthalene Balls	१६.	Bucket
५.	Brooms	१७.	Kharata Broom
६.	Mop Rough Duster	१८.	Garden Spade Big (Favada) with Standard Handle
७.	Toilet Cleaning Liquid	१९.	Ghamela
८.	Mugs	२०.	Mask
९.	Dustbin	२१.	Hand Gloves
१०.	Cleaning Powder	२२.	Shoes / Sandals / Gum-Boots
११.	Washing Powder	२३.	Raincoat (Rain season)
१२.	Toilet Brush	२४	Apron / Uniform

वरील तक्त्यानुसार प्रभागनिहाय अकुशल संवर्गातील मनुष्यबळ पुरवठा व साहित्य पुरवठ्याचा एकूण मासिक खर्च खालीलप्रमाणे :

अ.क्र.	प्रभाग समिती	स्मशानभूमींची ठिकाणे	प्रभाग समिती निहाय आवश्यक अकुशल मनुष्यबळ संख्या (Reliever सहित)	मंजूर किमान वेतन दर प्रती अकुशल मनुष्यबळ व देखभाल करिता साहित्य पुरवठा प्रती महिना	अपेक्षित अंदाजे खर्च रु.
१	A	नारिंगी	४०	२७,६१२	११,०४,४८०
२		पुरापाडा			
३		रानपाडा			
४		डोंगरपाडा			
५		झाडका			
६		वटार			
७		आंबेडकर आगाशी			
८		विराटनगर स्मशान/दफन			
९		दिवलईपाडा			
१०		चिखलडोंगरी			
११		नवापूर (आगाशी)			
१	B	मनवेलपाडा स्मशानभूमी, विरार (पु.)	७		१,९३,२८४
२		मोरेगाव स्मशानभूमी			
१	C	फुलपाडा	२३		६,३५,०७६
२		कातकरीपाडा			
३		गासकोपरी			
४		वनोठापाडा			
५		भाटपाडा RTO बाजूला			
६		वंगणपाडा			
७		दहिसर			
८		शिरगांव			
९		कसराळी			
१०		तलावपाडा			
११		फणसपाडा			
१२		कोशिंबे			
१३		कुंभारपाडा			
१४		गडगापाडा			
१५		बरफपाडा			
१	D	आचोळे स्मशानभूमी	२१		५,७९,८५२

२		तुळींज स्मशानभूमी			
१	E	गास फाटा	२८	२७,६१२	७,७३,१३६
२		गास बंदरवाडी			
३		भुईगांव खुर्द			
४		भुईगांव बुद्रुक			
५		निर्मळ			
६		समेळपाडा			
७		नाळा			
८		वाघोली			
९		कळंब, मर्देस, नवाळे			
१	F	धानिव	१३		३,५८,९५६
२		जाबरपाडा			
३		चांदीप			
४		कोपर काशिद			
५		शिरसाड मांडवी			
६		वालईपाडा			
७		बिलालपाडा			
१	G	राजावली व आश्रम	४२		११,५९,७०४
२		धुमाळनगर			
३		परेरानगर			
४		जूचंद्र			
५		कोल्ही			
६		चिंचोटी			
७		सागपाडा/देवदळ			
८		ससुनवघर			
९		कामण/बेलकडी			
१०		कामण खिंडीपाडा			
११		सातिवली			
१२		वालीव नाईकपाडा			
१३		गोखिवरे देवीपाडा			
१४		गोखिवरे गावराईपाडा			
१५		गोखिवरे चिंचपाडा/भोयदापाडा			
१६		गोखिवरे जानकीपाडा			
१७		सातिवली तारकेनगर			
१८		बापाणे			
१	H	नवघर	२३		६,३५,०७६
२		दिवाणमान स्मशानभूमी			
३		उमेळमान स्मशानभूमी			
१	I	पापडी	२४		६,६२,६८८

२		उमेळा			
३		नायगांव			
४		पाचूबंदर			
५		बेणापट्टी			
६		दत्तधाम			
		एकूण	**२२१**	**प्रति माह**	**रु.६१,०२,२५२/-**

सदर काम राबविण्यासाठी संस्था, NGO, ट्रस्ट मंडळे, नोंदणीकृत ठेकेदार यांच्या कडून ई-निविदा मागवून स्मशानभूमींची देखभाल केल्यास उपयुक्त ठरेल.

स्मशानभूमीमध्ये नियुक्त ठेकेदारामार्फत पुढील प्रमाणे कामे करणे आवश्यक राहील.

१. स्मशानभूमीचे गेट उघडणे बंद करणे.

२. स्मशानभूमीमध्ये साफसफाई करणे.

३. स्मशानभूमीमध्ये लाईट चालू बंद करणे.

४. स्मशानभूमीमध्ये झाडे असल्यास पाण्याची व्यवस्था करणे.

५. स्मशानभूमीमध्ये आलेल्या नागरिकांना पाणी उपलब्ध करून देणे.

६. स्मशानभूमीमधील शेगडीवर व गोडाऊनमध्ये लाकडे रचणे.

७. स्मशानभूमीमध्ये लाकडांची नोंद घेणे, लाकडाचा साठा अद्यावत ठेवणे.

८. वैद्यकिय दाखला स्विकारून अंत्यविधीसाठी अनुमती देणे, प्राप्त वैद्यकीय दाखल संकलित करून रजिस्टर मध्ये नोंद ठेवणे.

९. स्मशानभूमीमध्ये स्वच्छतागृह असल्यास स्वच्छतागृह साफसफाई करणे.

१०. स्मशानभूमीच्या आतील भागाचा गैरवापर होणार नाही ह्याची दक्षता घेणे.

११. स्मशानभूमीची सुरक्षा व्यवस्था पाहणे.

१२. गॅसवाहिनी / पर्यावरणपूरक शवदाहिनीचे नियंत्रण ठेवणे.

सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध स्मशानभूमीची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी रक्कम **रु.६१,०२,२५२/-** एवढा मासिक खर्च अपेक्षित आहे. तसेच रक्कम **रु.७,३२,२७,०२४/-** इतका वार्षिक खर्च व रक्कम **रु.२१,९६,८१,०७२/-** इतका त्रैवार्षिक खर्च अपेक्षित

आहे. शासन परिपत्रक अन्वये विशेष भत्त्यात वेळोवेळी होणारी वाढ महानगरपालिकेकडून निविदाधारकास देय राहील.

सदर कामाचा खर्च **"दहन व दफनभूमी सुरक्षा रक्षकासह देखभाल"** या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

सदर मनुष्यबळावर किमान वेतनाच्या सध्याच्या मंजूर दराप्रमाणे खालील तक्त्यात नमूद नुसार खर्च अपेक्षित आहे.

पद	आवश्यक अकुशल मनुष्यबळ	मंजूर किमान वेतन दर प्रती अकुशल मनुष्यबळ व देखभाल करिता साहित्य पुरवठा प्रती महिना	अपेक्षित मासिक खर्च	अपेक्षित वार्षिक खर्च	अपेक्षित त्रैवार्षिक खर्च
अकुशल मनुष्यबळ संवर्ग	२२१	२७,६१२	६१,०२,२५२	७,३२,२७,०२४	२१,९६,८१,०७२
अपेक्षित खर्चावर ५.२५% च्या कमाल मर्यादेत ठेकेदाराचा नफा		-	३,२०,३६८	३८,४४,४१९	१,१५,३३,२५६
मूळ (बेसिक) वेतन नुसार विशेष भत्त्यातील होणारी ८% वार्षिक वाढ		९२०	१६,९४३	२,०३,३२०	६,०९,९६०
		एकूण अपेक्षित खर्च रु.	**६४,३९,५६३**	**७,७२,७४,७६३**	**२३,१८,२४,२८८**

वरीलप्रमाणे किमान वेतनाच्या सध्याच्या मंजूर दरानुसार अपेक्षित खर्चावर ५.२५% च्या कमाल मर्यादेत ठेकेदाराचा नफा आणि मूळ (बेसिक) वेतन नुसार विशेष भत्त्यातील होणारी ८% वार्षिक वाढ धरुन **रु.२३,१८,२४,२८८/- (अक्षरी रुपये तेवीस कोटी अठरा लाख चोवीस हजार दोनशे अठ्याऐंशी मात्र)** इतका त्रैवार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी रक्कम **रु.६४,३९,५६३/-** एवढा मासिक खर्च अपेक्षित आहे. तसेच रक्कम **रु.७,७२,७४,७६३/-** इतका वार्षिक खर्च व रक्कम **रु.२३,१८,२४,२८८/- (अक्षरी रुपये तेवीस कोटी अठरा लाख चोवीस हजार दोनशे अठ्याऐंशी मात्र)** इतका त्रैवार्षिक खर्च अपेक्षित आहे.

मूळ तरतूद :- रु.६,००,००,०००/-

प्रस्तावित खर्च :- रु.७,७२,७४,७६३/- (प्रती वर्षी)

यास्तव सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता प्रती वर्ष अर्थसंकल्पात सदर कामाकरीता सदर लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद करण्याची तजवीज ठेवण्यात येईल.

सदर कामी वेळोवेळी तरतूदमध्ये वाढ करुन पुढील ३ वर्ष सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर अपेक्षित त्रैवार्षिक खर्च रक्कम **रु.२३,१८,२४,२८८/- (अक्षरी रुपये तेवीस कोटी अठरा लाख चोवीस हजार दोनशे अठ्याऐशी मात्र)** इतक्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेकामी सदरची नवीन ई-निविदाची कार्यवाही करणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय:- **सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरीता (दि.०१ ऑगस्ट २०२५ ते दि.३१ जुलै २०२८ या कालावधीकरिता) वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर अपेक्षित खर्च रक्कम रु.२३,१८,२४,२८८/- (अक्षरी रुपये तेवीस कोटी अठरा लाख चोवीस हजार दोनशे अठ्याऐशी मात्र) इतक्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता आणि नवीन ई-निविदा प्रक्रिया प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.**

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पश्चिम), जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी – ०२५०-६८१४०००, ६६३००००

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.१००८ विभाग: बांधकाम

दिनांक:१७/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ, जी,एच व आय मधील विविध ठिकाणी गटारांवर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यांवर फायबर झाकणे पुरविणे व बसविणेकामी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- प्रशासकीय ठराव क्र.२१९९ दि.०४/०२/२०२५ रोजी सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच व आय मधील विविध ठिकाणी गटारांवर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यांवर फायबर झाकणे पुरविणे व बसविणेकामी प्रती वर्षी रु.८ कोटींप्रमाणे तीन वर्षांकरिता रक्कम रु.२४ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर मान्यतेच्या अनुषंगाने बी-२ पध्दतीची ई निविदा प्रसिध्द करण्यात आली असून त्यानुसार तांत्रिक लिफाफा क्र.१ उघडण्यात आलेला आहे व त्याची कार्यवाही सुरु आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार व महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीनुसार सदर प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत सन २०२५-२६ ते सन २०२७-२८ या कालावधीकरिता रक्कम रु.२४ कोटींऐवजी प्रती वर्षी रक्कम रु.५ कोटी प्रमाणे एकूण रु.१५ कोटी इतक्या रक्कमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचा खर्च गटारावर चेंबर व चेंबर व्यवस्था या लेखाशिर्षातर्गत करण्यात येणार आहे.

करिता सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच व आय मधील विविध ठिकाणी गटारांवर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यांवर फायबर झाकणे पुरविणे व बसविणेकामी रक्कम रु.२४ कोटींऐवजी प्रती वर्षी रक्कम रु.५ कोटी प्रमाणे एकूण रक्कम रु.१५ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळणेस सदरचा प्रस्ताव बांधकाम विभागाने सादर केला आहे.

प्रस्तावाचा निर्णय:- सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच व आय मधील विविध ठिकाणी गटारांवर, फुटपाथवर व

मुख्य रस्त्यांवर फायबर झाकणे पुरविणे व बसविणेकामी प्रती वर्षी रु.८ कोटींनुसार तीन वर्षांकरिता एकूण रक्कम रु.२४ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय ठराव क्र.२१९८ दि.०४/०२/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्याऐवजी सन २०२५-२६, सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षांकरिता प्रती वर्षी रक्कम रु.५ कोटींप्रमाणे एकूण रक्कम रु.१५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.पालघर, पिन नं.४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

प्रशासकीय ठराव क्र. १०१० **दिनांक :** १७/०७/२०२५

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (प.) प्रभाग क्र.३२ मध्ये दिवलईपाडाच्या कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्रास (G+२) इमारत बांधणे व इतर कामे करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती - ए अंतर्गत येणाऱ्या वाढत्या लोकसंख्येस सेवा सुविधा देणेसाठी कार्यरत असलेल्या बोळींज विरार (प.) येथील दिवलईपाडा येथील तात्कालीन कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्र सुरु करणेसाठी अस्तित्वातील (G+2) इमारतीची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन लगत नविन इमारत (G+2) बांधण्याची आवश्यकता होती.

त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका विरार (प.) प्रभाग क्र.३२ मध्ये दिवलईपाडा येथील कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्रासाठी (G+२) इमारत बांधणे व इतर कामे करणे कामास मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी रु.१,८५,०२,५५३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३३५ दि.०.६/०१/२०२१ रोजी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदरचे अंदाजपत्रक १२% जी.एस.टी. रक्कमेनुसार बनविण्यात आले होते. तद्नंतर सदर कामास मा.शहर अभियंता ह्यांची दि.०६/०१/२०२१ रोजी १२% जी.एस.टी.नुसार रक्कम रु.१,६४,१५,३१२/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजुरी घेऊन ई-निविदा दि.१५/०१/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदेमध्ये एकूण ०४ निविदाकार प्राप्त झाले असून लघुत्तम निविदाधारक मे.सुहास एन्टरप्रायजेस ह्यांची ०.६६% कमी दराची निविदा मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.९८९ दि.२६/०९/२०२२ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर निविदाकाराकडून २% सुरक्षा अनामत भरुन, करारनामा करुन जा.क्र.वविशम/बांध/१३५३/२०२२ दि.२५/११/२०२२ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

परंतु कोव्हीडच्या दुस-या लाटेच्या वेळी सदर इमारतीच्या जवळच असलेल्या खारोडी येथील इमारत माता बाल संगोपन केंद्र म्हणुन सुरु करण्यात आले आहे. सदर कामी अंदाजपत्रकात G+2 आर.सी.सी इमारतीचे नव्याने बांधकाम करणे, अस्तित्वातील G+2 इमारतीची डागडुजीकरुन इमारतीत इतर कामे करणे, इमातीसाठी लागण-या इतर अनुशांगीक बाबी अदा भुमीगत पाण्याची टाकी, कॉक्रीट पाथवे , वेटीग शेड व कुंपन भिंत अश्या बाबींचा

समावेश होता. परंतु भविष्याच्या दृष्टीने बोळींज परिसरामध्ये झपाट्याने वाढ होत असलेल्या शहरीकरणमुळे इतर वैद्यकीय सेवा देणे सुलभ होईल या अनुशंगाने सदरची इमारत G+4 करणे आवश्यक आहे. त्यामुळे तांत्रिक सल्लागार मे. के.के.टेक्नोट्रेड यांना इमारतीचे आर.सी.सी. डीझाईन व नकाशे G+4 मजल्यानुसार करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार ठेकेदार मे. सुहास एन्टरप्रायजेस यांनी सुधारीत नकाशे आणि आर.सी.सी. डिझाईन नुसार काम सुरु केले आहे. तरी सदरच्या वाढीव कामामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ होणार आहे. सदर वाढीव कामाची निविदा काढल्यास काम पुर्ण होण्यास विलंब होणार आहे. तरी विलंब टाळण्यास सदर काम मुळ ठेकेदारकडुन करुन घेणे योग्य होईल.

सदरच्या कामाचे मुळ अदाजपत्रक रक्कम रु.१,६४,१५,३१२/- इतक्या रक्कमेचे आहे. मुळ अंदाजपत्रकीय बाबींच्या परिमाणात वाढ झाली आहे. तसेच काही अतिरिक्त बाबींचे काम करणे आवश्यक असल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकात समावेश करण्यात आल्या आहेत. तसेच मुळ अंदाजपत्रक १२ % जी.एस.टी. नुसार बनविण्यात आले होते. त्यानुसार सदर कामाचे सुधारीत नकाशे व आर.सी.सी. डिझाईन नुसार तांत्रिक सल्लागार मे. के.के.टेक्नोट्रेड यांनी रक्कम रु.३,३३,४१,३३८/- रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. तरी सदरच्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदरच्या कामाची मुळ मुदत दि.२४/०६/२०२३ रोजी संपली आहे. ठेकेदार मे. मे.सुहास एन्टरप्रायजेस यांनी दि.२०/०३/२०२४ च्या पत्रान्वये सदरचे काम पुर्ण करणे साठी मुदतवाढीची मागणी केली आहे. तरी सदर वाढीव काम पुर्ण करण्यासाठी दिनांक ३१/०५/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणे योग्य होईल.

तरी विरार (प.) प्रभाग क्र.३२ मध्ये दिवलईपाडा येथील कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्रासाठी (G+२) इमारत बांधणे व इतर कामे करणे कामाच्या तांत्रिक सल्लागार मे. के.के.टेक्नोट्रेड यांनी सादर केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकात मुळ अंदाजपत्रकातील बाबींच्या परिमाणत झालेल्या वाढीमुळे, अतिरीक्त बाबींचे काम आवश्यक असल्यामुळे व सुधारीत अंदाजपत्रक १८% जी.एस.टी. नुसार बनविण्यात आल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.३,३३,४१,३३८/- इतकी असुन वाढीव कामाची निविदा काढल्यास काम पुर्ण करुन घेण्यास विलंब होणार आहे. तरी मुळ ठेकेदार मे.सुहास एन्टरप्रायजेस यांचे कडुन करणेस्तव वाढीव कामाच्या रक्कम रु.३,३३,४१,३३८/- च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मान्यतेस्तव सादर. व सदर काम पुर्ण करुन घेणेसाठी दिनांक ३१/०५/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणेस मंजुरीस्तव सादर.

याकामी खालील विहित करुन देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.३१/०१/२०२५
२.	सुधारीत कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.०५/०२/२०२५
३.	काम सुरु करणे	दि.०५/०२/२०२५
४.	काम पूर्ण करणे	दि.०५/०८/२०२५
५.	देयक सादर करणे	दि.१५/०८/२०२५
६.	देयकाचे प्रदान करणे	दि.२५/०८/२०२५

ठराव / निर्णय :- सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१.	सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता	दि.३१/०१/२०२५
२.	सुधारीत कार्यादेश देणे/करारनामा करणे	दि.०५/०२/२०२५
३.	काम सुरु करणे	दि.०५/०२/२०२५
४.	काम पूर्ण करणे	दि.०५/०८/२०२५
५.	देयक सादर करणे	दि.१५/०८/२०२५
६.	देयकाचे प्रदान करणे	दि.२५/०८/२०२५

सदर कामाकरीता उपरोक्त नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR 1979 प्रमाणेकार्यवाहीस पात्र राहतील.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका विरार (प.) प्रभाग क्र.३२ मध्ये दिवलईपाडा येथील कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्रासाठी (G+२) इमारत बांधणे व इतर कामे करणे कामाच्या तांत्रिक सल्लागार मे. के. के. टेक्नोट्रेड यांनी सादर केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकात मुळ अंदाजपत्रकातील बाबींच्या परिमाणत झालेल्या वाढीमुळे, अतिरीक्त बाबींचे काम आवश्यक असल्यामुळे व सुधारीत अंदाजपत्रकात १८% जी.एस.टी. नुसार बनविण्यात आल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.३,३३,४१,३२८/- इतकी झाली असुन वाढीव कामाची निविदा काढण्यास काम पूर्ण करुन घेण्यास विलंब होणार आहे. तरी मुळ ठेकेदार मे. सुहास एन्टरप्रायजेस यांचे कडुन करणेस्तव वाढीव कामाच्या रक्कम रु.३,३३,४१,३२८/- च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेऊन संबंधित निविदेअंतर्गत पुढील कार्यवाही करणेस तसेच त्याअनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. व सदर काम पूर्ण करुन घेणेसाठी दिनांक ३०/११/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच इस्टीमेट मधील प्रत्येक टप्यावरील केलेल्या कामाचे Geo-Tagged फोटोग्राफ्स सादर करणे आवश्यक राहील तद्नंतरच कामाचे बील अदा करणेत यावे.

17/07

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ ,फॅक्स — ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १०११ **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक : १७/०७/ २०२५

प्रस्तावाचा विषय वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (पू) येथील बहुउद्देशीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात विविध कामे करणे कामी नोंदणीकृत ठेकेदार मे. एम. अॅण्ड एन. एंटरप्रायजेस यांच्या कडून जिल्हा दरसुची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रका नुसार काम करून घेण्यासाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

अ.क्र.	कामाचे नाव	कामाचे स्वरूप	ठेकेदाराचे नाव
१	वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (पू) येथील बहुउद्देशीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात विविध कामे करणे.	Executive Table, Sofa Set, Partition, Carpet, Curtain, tile work, plumbing work, painting etc.	मे. एम. अॅण्ड एन. एंटरप्रायजेस

या करीता वर नमुद ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग राज्य दर सुची नूसार कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. तसेच दरसूची मध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी बाजारभावानुसार अंतर्भूत केल्या आहेत. त्यानुसार याकामा मध्ये वर नमूद केलेल्या मान्यता प्राप्त ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दराने तातडीने काम करणे बाबत समर्थता दर्शविलेली आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रू. ८,५२, १८४/-
यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशील	:-	यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेले नाही
जागेची मालकी	:-	वसई विरार शहर महानगरपालिका

तरी वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (पू) येथील बहुउद्देशीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात विविध कामे करणे कामी एकूण रक्कम रू.८,५२, १८४/- इतक्या झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता इच्छुक अनुभवी ठेकेदार मे. एम. अॅण्ड एन. एंटरप्रायजेस यांच्या मार्फत करुन घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकिय मान्यता देणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजुरी घेणे,ई- निविदा मागवून निविदा प्रक्रिया करणे हे पुढील नमूद मुदतीत पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करून कार्यादेश देणे,काम सुरु करून विहीत मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ.सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	कार्योत्तर संविदा मंजूरी ठराव	दि. ०४/०६/२०२५
२	कार्योत्तर कार्यादेश देणे / करारनामा करणे	दि. ०५/०६/२०२५
३	देयक सादर करणे	दि. १०/०६/२०२५
४	देयकाचे प्रदानकरणे	दि. ११/०६/२०२५

वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (पू) येथील बहुउद्देशीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात विविध कामे करणे याकामी बांधकाम विभागामार्फत चालू राज्य दरसूची सन २०२२-२३ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ८,५२, १८४/- अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
१	कार्योत्तर संविदा मंजूरी ठराव	दि. ०४/०६/२०२५
२	कार्योत्तर कार्यादेश देणे / करारनामा करणे	दि. ०५/०६/२०२५
३	देयक सादर करणे	दि. १०/०६/२०२५
४	देयकाचे प्रदानकरणे	दि. ११/०६/२०२५

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका विरार (पू) येथील बहुउद्देशीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात विविध कामे करणे कामी रू. ८,५२, १८४/- इतक्या रक्कमेस कार्योत्तर प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत असून सदर काम तातडीने करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता अनुभवी ठेकेदार मे. एम. ॲण्ड एन. एंटरप्रायजेस यांच्या मार्फत करण्यात आलेल्या कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

17/9

अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ ,फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७०१२ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : १७/०७/ २०२५

---

१. प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील विरार मुख्य कार्यालयात तिसऱ्या मजल्यावर फर्निचरची कामे, ग्लास डोअर व कार्पेट वर्कची कामे करणे.

२. प्रस्तावाचा मजकूर वसई- विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार मुख्यालय कार्यालयातील मा.अति.आयुक्त यांनी त्यांना भेटीदाखल वारंवार नागरीकांचे समस्या सोडविण्याच्या माध्यमातून उपद्रव होऊ नये यासाठी पॅसेज व केबिन मधील ग्लास डोअर वर्कची कामे करणेबाबत दिलेल्या सुचनेनुसार मा.अति.आयुक्त यांचे केबिनला व पॅसेजमध्ये ग्लास डोअर बसविणे गरजेचे आहे. तसेच कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार तिसऱ्या मजल्यावर फर्निचरची कामे करणे गरजेचे आहे.

त्यानुसार सदर कामाचे रू. ९,७४,४३९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेआहे.

३. अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. ९,७४,४३९/-

४. कामाचे स्वरूप :- फर्निचरची कामे, ग्लास डोअर व कार्पेट वर्कची कामे

५. यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल:- सदर काम मागील ३ वर्षात झालेले नाही.

६. जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७. विकासआराखडयातील आरक्षण -

वरील काम करण्यासाठी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून सन २०२२-२३ च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर सूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग – ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, वसई- विरार शहर महानगरपालिका यांचे कडील कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आ.का./४७/२०२१ दि. २५/०६/२०२१ अन्वये अत्यावश्यक सेवेत येणारी अत्यंत अपवादात्मक स्वरूपाची कामे कार्यकारी अभियंता यांचे मान्यतेने करणेत यावेत असे आदेश आहेत.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन तांत्रिक मंजूरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे, संविदा मंजूरी करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. प्रक्रिया नमुद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

याकामी खालील विहित करून देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकरी/ कर्मचारी यांची असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
०१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ
०२.	निविदा प्रसिद्ध करणे	दि. १३/०६/२०२५
०३.	प्रथम लिफाफा उघडणे	दि. २३/०६/२०२५
०४.	द्वितीय लिफाफा उघडणे	दि. ३०/०६/२०२५
०५.	संविदा मंजूरी ठराव	दि. ०८/०७/२०२५
०६.	कार्यादेश देणे/ करारनामा करणे	दि. ०९/०७/२०२५
०७.	काम सुरू करणे	दि. १०/०७/२०२५
०८.	काम पूर्ण करणे	दि. ०८/०८/२०२५
०९.	देयक सादर करणे	दि. १३/०८/२०२५
१०.	देयकाचे प्रदान करणे	दि. २०/०८/२०२५

तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाची असल्याने वरील नमुद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

अ.क्र.	बाब	अपेक्षित दिनांक
०१.	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम अधिकाऱ्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर तात्काळ
०२.	निविदा प्रसिद्ध करणे	दि. १३/०६/२०२५
०३.	प्रथम लिफाफा उघडणे	दि. २३/०६/२०२५
